रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक २१
www.ramprahar.com
बुधवार, ७ ऑगस्ट २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

कार्यरत ३१०५ विशेष शिक्षकांना सेवेत घेणार/२
सुधागडमध्ये बिबट्याची दहशत; जनावरे फस्त/५
पॅरिस ऑलिम्पिकमध्ये मनू भाकरला बहुमान/८

## भालाफेकपटू नीरज चोप्रा अंतिम फेरीत दाखल

**पॅरिस** : भारताचा स्टार भालाफेकपटू नीरज चोप्रा पॅरिस ऑलिम्पिकमध्ये त्याच्या पहिल्याच प्रयत्नात



अंतिम फेरीसाठी पात्र ठरला आहे. नीरजने ८९.३४ मीटर भालाफेक केली. नीरजच्या या उत्कृष्ट कामगिरीने पुन्हा एकदा संपूर्ण देशाला त्याच्याकडून सुवर्णपदकाची अपेक्षा आहे. नीरज चोप्रा हरियाणाच्या पानिपत जिल्ह्यातील खांद्रा गावचा रहिवासी आहे. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये नीरजने आतापर्यंतची सर्वोत्तम थ्रो केला आहे. टोकियो ऑलिम्पिकचा गोल्डन बॉय नीरजने पात्रता फेरीत ८९.३४ मीटर फेक करून अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. त्याचा अंतिम सामना ८ ऑगस्टला होणार आहे. २०२०च्या टोकियो ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकून नीरज संपूर्ण देशाचा हिरो बनला. आताही देशाला त्याच्याकडून सुवर्णपदक अपेक्षित आहे. आता तो देशवासीयांच्या अपेक्षा पूर्ण करतोय का हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# विरोधक विषाप्रमाणे काम करताहेत

## भाजप नेते आमदार संजय केळकर यांचा घणाघात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष हा सत्तेकडे लोकांच्या सेवेसाठी म्हणून बघतो, मात्र विरोधक स्वार्थासाठी सत्ता मिळवू पाहत आहे. त्या अनुषंगाने लोकसभा निवडणुकीपासून विरोधकांनी अपप्रचार सुरू केला आहे. विष ज्या प्रमाणे पसरवले जाते त्या प्रमाणे विरोधी पक्ष विषारी काम करत आहेत, अशी घणाघाती टीका भाजप नेते, ठाण्याचे आमदार संजय केळकर यांनी मंगळवारी (दि. ६) पनवेल येथे केली. भाजप उत्तर रायगड जिल्हा विस्तारित कार्यकारिणीची बैठक शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात झाली. त्या वेळी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.



(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

या बैठकीस व्यासपीठावर प्रमुख मान्यवर म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, उपाध्यक्ष अतुल काळसेकर, सदस्य बाळासाहेब पाटील, कोकण विभाग संघटन मंत्री शैलेंद्र दळवी, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, दीपक बेहेरे, चारूशीला घरत, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष अनिल भगत, अभिजित पेडणेकर, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, कामोठे अध्यक्ष रवींद्र जोशी, खारघर अध्यक्ष प्रवीण पाटील, कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील, कर्जत तालुकाध्यक्ष राजेश भगत, खालापूर तालुकाध्यक्ष प्रवीण मोरे, खोपोली अध्यक्ष रमेश रेटरेकर, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, भाजप कर्जत विधानसभा संयोजक किरण ठाकरे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर आदी उपस्थित होते. या बैठकीला स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी, जिल्हा पदाधिकारी, विविध सेल, मोर्चाचे पदाधिकारी उपस्थित होते. (पान २ वर..)

### फेक नरेटिव्ह पसरवले गेले –आमदार प्रशांत ठाकूर

आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हटले की, पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांना देशाने तिसऱ्यांदा कौल दिला, मात्र सलग निवडणुका नापास झालेल्या काँग्रेस आणि त्यांच्या सहकाऱ्यांना स्वतः चिंतन करण्याऐवजी दुसऱ्याच्या बाबतीत अपप्रचार करण्यात धन्यता वाटत आहे. जातीपातीचे राजकारण करून लोकांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचे काम या लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी केल्याचे सर्व देशाने बघितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधान कधीही बदलणार नाही, मात्र त्याचाही दुरूपयोग करून फेक नरेटिव्ह पसरवण्यात आले.

### पनवेल तालुका उपाध्यक्षपदी एस.के. नाईक यांची नियुक्ती

रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य आणि कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती एस.के. नाईक यांची भाजपच्या पनवेल तालुका उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली असून याबाबतचे नियुक्तीपत्र त्यांना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते विस्तारित जिल्हा कार्यकारिणीच्या बैठकीत प्रदान करण्यात आले.



### ठाकरे गटाचे पदाधिकारी, कार्यकर्ते भाजपमध्ये

भाजपची विचारधारा आणि सक्षम नेतृत्वावर प्रभावित होऊन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या ट्रान्सपोर्ट सेलचे प्रदेश उपाध्यक्ष सुनील उपाध्याय यांच्यासह कार्यकर्त्यांनी या वेळी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. या प्रवेशकर्त्यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार संजय केळकर यांनी पक्षाची शाल देऊन भाजपमध्ये स्वागत केले.



भाजपचे उत्तर भारतीय मोर्चा जिल्हाध्यक्ष संतोष शर्मा आणि महासचिव राजेश पांडे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाच्या ट्रान्सपोर्ट सेलचे प्रदेश उपाध्यक्ष सुनील उपाध्याय, अनिल सिंह, कृपाशंकर उपाध्याय, राजेश तिवारी, आनंद मिश्रा, सुधा मिश्रा, पुष्पा तिवारी, भारती मिश्रा, रीना राय, सुजीत मिश्रा यांनी भाजपचा झेंडा हाती घेतला.

# बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांनी भारतात येण्यासाठी केली होती विनंती

## परराष्ट्रमंत्री एस.जयशंकर यांची माहिती



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बांगलादेशमध्ये हिंसाचार उसळल्यानंतर पंतप्रधान शेख हसीना यांनी देश सोडून भारतात येण्यासाठी विनंती केली होती, अशी महत्त्वपूर्ण माहिती परराष्ट्रमंत्री एस.जयशंकर यांनी मंगळवारी (दि. ६) संसदेत दिली.

बांगलादेशमध्ये हिंसाचार उसळल्यानंतर पंतप्रधान शेख हसीना यांनी सोमवारी पदाचा राजीनामा देत देश सोडला आणि त्या भारतात दाखल झाल्या आहेत. त्यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिल्याने बांगलादेशमध्ये अस्थिरतेची स्थिती निर्माण झाली आहे.


बांगलादेशमधील सर्व घडामोडींचा आपल्याकडे परिणाम होण्याची शक्यता असल्याने मंगळवारी भारतात सर्वपक्षीय बैठक झाली. या बैठकीनंतर परराष्ट्रमंत्री एस.जयशंकर यांनी बांगलादेशातील सध्याच्या परिस्थितीवर माहिती देत संसदेत निवदेन केले. ते म्हणाले की, बांगलादेशमध्ये जुलै महिन्यांपासून हिंसाचाराच्या घटना घडत आहेत. तेथील आरक्षणाच्या प्रश्नासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने एक निर्णय दिला होता, मात्र त्यानंतरही त्या ठिकाणी हिंसाचाराच्या घटना सुरू होत्या. आंदोलनकर्त्यांना शेख हसीना यांना हटवायचे होते. हिंसाचाराच्या घटना वाढल्यानंतर ५ ऑगस्ट रोजी शेख हसीना यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर बांगलादेश सोडताना त्यांनी भारतात येण्यासाठी विनंती केली होती.

बांगलादेशमध्ये घडणाऱ्या घडामोडींवर भारताची नजर आहे. बांगलादेशमध्ये सध्या १९ हजार भारतीय नागरिक असल्याचा अंदाज असून जवळपास नऊ हजार भारतीय विद्यार्थी आहेत तसेच बांगलादेशमधील हिंदूंच्या विरोधातील हिंसा ही चिंतेची बाब आहे. याशिवाय सर्व परिस्थिती पाहता भारत आणि बांगलादेश सीमांवर अलर्ट जारी करण्यात आला आहे, असेही परराष्ट्रमंत्री एस.जयशंकर यांनी या वेळी सांगितले.

## निवडक

### भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी रुग्णालयात दाखल

**नवी दिल्ली** : भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण



अडवाणी यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना मंगळवारी (दि. ६) सकाळी इंद्रप्रस्थ अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. न्यूरोलॉजी विभागात न्यूरो सर्जन डॉ. विनीत सुरी यांच्या नेतृत्वाखाली डॉक्टरांचे पथक अडवाणी यांच्यावर उपचार करत आहे. त्यांची तब्येत स्थिर असून ते डॉक्टरांच्या निरीक्षणाखाली असल्याची माहिती रुग्णालयाकडून देण्यात आली आहे.

## पूरग्रस्तांसाठी सातारा–सांगली–कोल्हापूर विशेष रेल्वेगाडी दररोज धावणार

**सांगली : प्रतिनिधी**

नागरिक जागृती मंचने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केलेल्या मागणीनंतर रेल्वे प्रशासन पूरग्रस्तांच्या मदतीसाठी पुढे आले आहे. ७ ऑगस्टपासून १३ ऑगस्टपर्यंत सातारा–सांगली–कोल्हापूर विशेष रेल्वेगाडी दररोज धावणार आहे.

सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे २० जुलैपासून कृष्णा, वारणा, कोयना, पंचगंगा, येरळा नद्या भरून वाहत आहेत. तिन्ही जिल्ह्यातील अनेक रस्ते पुराच्या पाण्याखाली आहेत. सध्या पूर ओसरत असला तरी वाहतूक सुरळीत होण्यास काही दिवस लागणार आहेत. पुराच्या काळात अनेक गावांतील एसटीच्या फेऱ्या रद्द झाल्या. अजूनही काही मार्गावर फेऱ्या बंद आहेत.

सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यातील पूरग्रस्तांसाठी संपर्क क्रांती गाड्या सांगली, भिलवडी, कराड व किर्लोस्करवाडी स्टेशनवर थांबवाव्या तसेच किर्लोस्करवाडी व भिलवडी येथे आणखी १० गाड्यांना थांबा देण्याची विनंती सांगली जिल्हा नागरिक जागृती मंचने केली होती. त्यानुसार सातारा–सांगली–कोल्हापूर पूर विशेष रेल्वेगाडी सुरू करण्यात आली आहे.

## ‘त्या’ मतदारांनी नव्याने ओळखपत्र काढून घ्यावे

### विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोगाचे आवाहन

**अलिबाग : प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीचे वेध लागले असताना काही मतदारांकडे जीर्ण झालेल्या किंवा कृष्णधवल मतदार कार्डाबाबत जिल्हा निवडणूक यंत्रणेने आवाहन केले आहे. अशा मतदारांनी ८ नंबरचा अर्ज करून नवीन मतदार ओळखपत्र काढून घ्यावे, असे निवडणूक विभागाकडून सांगण्यात आले आहे.

नवीन निवडणूक ओळखपत्रासाठी ऑनलाईन अर्ज करता येतो. शासनाच्या संकेतस्थळावरही अर्ज उपलब्ध आहे. मोबाईलवर डाऊनलोड करून त्यावरूनही रंगीत मतदार ओळखपत्र काढून घेता येते.

निवडणूक आयोग सतत मतदार यादी अद्ययावत करत असतो. तपशिलांमध्ये तफावत आढळल्यास नाव यादीतून काढले जाते. यादीत नाव आहे का हे मतदाराने पहायला हवे. मोबाईलवर निवडणूक आयोगाचे व्होटर हे ॲप डाऊनलोड केल्यास त्यावरूनही मतदाराला नाव यादीत नोंदवता येते. घरबसल्याही प्रक्रिया करता येते. मतदानावेळी जुने ओळखपत्र दाखवायचे असल्यास मतदाराला सोबत ओळखीसाठी आधार कार्ड किंवा निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या १२ पुराव्यांपैकी एखादा सोबत ठेवावा लागतो. तो पुरावाही ग्राह्य धरला जातो.

**मतदार यादीत नाव नोंदवायचे असल्यास आयोगाच्या www.nvsp.in या संकेतस्थळावर नोंदवता येते. सध्या मतदार याद्यांचा पुनरीक्षण कार्यक्रम सुरू आहे. जुने मतदार कार्ड बदलायचे असल्यास बीएलओच्या माध्यमातून ८ क्रमांकाचा फॉर्म भरून नवे रंगीत ओळखपत्र मिळविता येईल. ज्यांचे ब्लॅक ॲण्ड व्हाईट मतदार ओळखपत्र आहे अशांनी ते ऑफलाइन किंवा ऑनलाईन बदलून घ्यावे.**

**–स्नेहा उबाळे, निवडणूक उपजिल्हाधिकारी**

## सार्वजनिक गणेशोत्सवानिमित्त सांस्कृतिक कार्य विभागातर्फे स्पर्धा



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे सन २०२४च्या गणेशोत्सवात सहभागी होणाऱ्या राज्यातील उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. राज्यातील पहिल्या तीन विजेत्या क्रमांकांना अनुक्रमे पाच लाख, अडीच लाख आणि एक लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. राज्यातील अधिकाधिक मंडळांनी यामध्ये सहभाग नोंदवावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले आहे.

राज्यात गणेशोत्सवास ७ सप्टेंबर रोजी सुरुवात होत आहे. राज्य समितीकडे जिल्हास्तरीय निवड समिती मुंबई, मुंबई उपनगर, पुणे, ठाणे या चार जिल्ह्यांतून प्रत्येकी तीन आणि अन्य जिल्ह्यातून प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण ४४ प्राप्त शिफारशींमधून गुणांकन आणि संबंधित कागदपत्रांच्या आधारे पहिल्या तीन विजेत्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची निवड केली जाणार आहे. विजेत्या गणेशोत्सव मंडळांना वगळून उर्वरित ४१ मंडळांना राज्य शासनाकडून प्रत्येकी २५ हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल.

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या mahotsav.plda@gmail.com या ई-मेल आयडीवर ३१ ऑगस्टपूर्वी परिपूर्ण अर्ज सादर करावेत.

या पुरस्कारांसाठी निवड होणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी विविध निकष असतील. त्यांना गुण दिले जातील. स्पर्धेत धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी केलेल्या किंवा स्थानिक पोलिसांकडे परवानगी घेतलेल्या किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेची परवानगी घेतलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सहभागी होता येईल. स्पर्धेसाठी सांस्कृतिक कार्यक्रम, स्पर्धांचे आयोजन, संस्कृतीचे जतन संवर्धन, राज्यातील गडकिल्ले यांचे जतन व संवर्धन, राष्ट्रीय–राज्य स्मारके, धार्मिक स्थळांविषयी जनजागृती, जतन व संवर्धन, सामाजिक उपक्रम, पर्यावरणपूरक मूर्ती, पर्यावरणपूरक सजावट (थर्मोकोल, प्लास्टिकविरहीत), ध्वनिप्रदूषणरहित वातावरण, पारंपरिक–देशी खेळांच्या स्पर्धा व गणेश भक्तांसाठी देत असलेल्या प्राथमिक सुविधा आदी बाबींवर गुणांकन होईल.

## रामप्रहर श्रावणधारा

**श्रावण सुरू झाला की, कविमन आपोआपच श्रावणधारांसारखं बहरू लागतं. नवनवीन कल्पना त्यांच्या डोक्यातून बाहेर पडतात आणि मग दरवर्षी पावसावरील कवितांचा जणू पाऊसच पडतो. यासाठी आम्ही सर्व कवींना आग्रहानं निमंत्रित करीत आहोत. मग विचार कसला करता, उचला आपली लेखणी आणि लिहा पाऊस कविता. आम्ही त्यास यथायोग्य प्रसिद्धी देऊ...**

**श्रावण संपेपर्यंत आपण स्वत: शब्दबद्ध केलेल्या कविता ‘रामप्रहर’मध्ये दररोज एक या प्रमाणे (एका कवीची एकच कविता) प्रसिद्ध करण्यात येणार आहे.**

**कवींनी आपली अप्रकाशित कविता स्वत:च्या छायाचित्रासह ‘रामप्रहर’कडे पाठवावी. त्या कवितेला ‘श्रावणधारा’ या सदराखाली यथायोग्य प्रसिद्धी देण्यात येईल.**

**–मुख्य संपादक**

**पत्ता : दै. रामप्रहर, अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रूपाली चौक, पनवेल ४१०२०६, रायगड.**
E.mail : ramprahar@gmail.com
**व्हॉट्सअॅप क्रमांक ७७३८१०६००९**



## निवडक

### शाळेतून साहित्याची चोरी

**पनवेल :** सुधागड एज्युकेशन सोसायटी माध्यमिक विद्यालय कोपरा सेक्टर १० येथील खिडकीचे लोखंडी ग्रील उचकटून चोरट्याने खिडकीच्या अल्युमिनियम फ्रेम सह इतर ऐवजाची चोरी केली. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. दोन ऑगस्ट रोजी सुधागड एज्युकेशन सोसायटी खारघर सेक्टर १० येथील शाळा कार्यालय बंद करून सर्व घरी गेले होते. कार्यालयाची खिडकीचे लोखंडी ग्रील तोडून चोरट्याने चोरी केल्याचे शिपायाने सांगितले. या वेळी चोराने समई, धातूची गणपतीची मूर्ती, ड्रिल मशीन, ग्राइंडर मशीन, ल्युमिनियमचे प्रेम चोरून नेले.

### पनवेलमधून मोटरसायकलची चोरी

**पनवेल :** शहरातील व्हि.के.हायस्कूल बाजूच्या एमएसईबीच्या ट्रान्सफार्मर जवळ रस्त्यावर उभी करून ठेवलेली होंडा कंपनीची मोटरसायकल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे. परेश मंजुळे यांनी त्यांची ३० हजार रुपये किंमतीची होंडा कंपनीची शाईन मोटार सायकल (एमएच-४६-बीएस-५५४१) ग्रे रंगाची ही सदर ठिकाणी उभी करून ठेवली होती. या वेळी अज्ञात चोरट्याने ती गाडी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### करंजाडेमध्ये अपघातात मुलगी जखमी

**पनवेल :** व्हॅगेनार गाडीच्या धडकेने १० वर्षीय मुलगी जखमी झाल्याची घटना करंजाडे वसाहतीमध्ये घडली आहे. रुपाली ढाकणे (१० रा.करंजाडे) ही राहत्या सोसायटीसमोरील दुकानात जाण्यासाठी रस्त्याच्या बाजूला जात असताना पांढऱ्या मारुती व्हॅगेनार गाडीच्या डाव्या बाजूचा आरसा मुलीच्या तोंडास लागला. त्यामुळे ती मुलगी रस्त्यावर पडून तीच्या ओठास, दातास व हनवुटीस दुखापत झाली. या घटनेनंतर तिला कोणतीही मदत न करता व्हॅगेनार गाडी चालक गाडीसह पसार झाल्याने याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### उरणमध्ये महादेव मंदिरांत गर्दी

**उरण :** पहिला श्रावणी सोमवारनिमित्त उरण तालुक्यात महादेवाच्या मंदिरात भक्तांनी दर्शनासाठी खुपच गर्दी केलि होती. घरापुरी, मानकेश्वर, बोरी येथील होनेश्वर, उरण शहरातील संगमेश्वर, उरण रेल्वे जवळ असलेले नील कंठेश्वर, सोनारी येथील फतलेश्वर मंदिर आदी ठिकाणी शंकराच्या मंदिरात भक्तांनी दर्शन घेतले. मंदिरांच्या ठिकाणी दूध, बेल, हार, फुले यांची दुकाने थाटण्यात आली होती. उरण तालुक्यातील केगाव ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील समुद्र किनारी असलेल्या मानकेश्वर मंदिरात शंकराच्या मंदिरात सकाळपासूनच भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.


### पनवेलमध्ये आढळला एकाचा मृतदेह

**पनवेल :** रेल्वे स्थानकादरम्यान एक बेशुद्ध अवस्थेतील व्यक्ती आढळला असून तो उपचाराआधी मयत झाला. त्याच्या नातेवाईकांचा शोध रेल्वे पोलीस घेत आहेत. मयत व्यक्तीचे वय ४० वर्षे असून उंची पाच फूट आठ इंच, केस बारीक वाढलेले, दाढी बारीक, चेहरा लांबट असून नाकावर डाव्या डोळ्याजवळ तीळ आहे. अंगात सफेद शर्ट, ग्रे जीन्स, कमरेला चामडी बेल्ट आहे. या व्यक्तीबाबत कोणास माहिती असल्यास त्यांनी पनवेल रेल्वे पोलीस ठाणे (०२२२७४६७१२२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# राज्यातील कार्यरत ३१०५ विशेष शिक्षकांना सेवेत सामावून घेणार

**मुंबई : प्रतिनिधी**

समग्र शिक्षा अभियान आणि दिव्यांग एकात्मिक शिक्षण योजनेंतर्गत २००६ पासून सेवेत असणाऱ्या ३१०५ विशेष शिक्षकांना सामावून घेण्याचा निर्णय मंगळवारी (दि. ६) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला. राज्यातील केंद्र शाळेला एक विशेष शिक्षक नेमण्याचे निर्देश देखील मुख्यमंत्र्यांनी शिक्षण विभागाला दिले.



दरम्यान, २००५ पूर्वी टप्पा अनुदानावर कार्यरत असलेल्या २६ हजार ९०० शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू केल्यास येणाऱ्या आर्थिक भारासंदर्भात फेर पडताळणी करण्यासाठी शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली आणि शिक्षक आमदारांचा समावेश असलेल्या समितीची स्थापना या वेळी करण्यात आली.

सह्याद्री अतिथीगृह येथे आज विशेष शिक्षक पदनिर्मिती, जुनी पेन्शन योजनेसंदर्भात बैठक झाली. या वेळी शिक्षण मंत्री दीपक केसरकर, मंत्री सर्वश्री संजय राठोड, संजय बनसोडे, आमदार सर्वश्री अभिमन्यू पवार, आशीष जयस्वाल, प्रकाश आबीटकर, किशोर दराडे, ज्ञानेश्वर म्हात्रे, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आय. एस. चहल, शिक्षण विभागाच्या प्रधान सचिव आय. एस कुंदन, आयुक्त सुरज मांढरे आदी या वेळी उपस्थित होते.

राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेत सध्या सुमारे २ लाख ४१ हजार दिव्यांग विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी राज्यात समग्र शिक्षा योजनेंतर्गत २००६ पासून कंत्राटी तत्वावर १०२ जिल्हा समन्वयक, गट स्तरावर ८१६ विषय तज्ञ, केंद्र शाळास्तरावर १७७५ असे एकूण २६९३ विशेष शिक्षक तर दिव्यांग एकात्मिक शिक्षण योजनेतर्गत प्राथमिक स्तरावरील ५४ व माध्यमिक स्तरावरील (IEDSS)- ३५८ मिळून ४१२ असे एकूण ३१०५ विशेष शिक्षक आहेत.

दिनांक १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयाप्रमाणे प्रत्येक तालुक्याच्या केंद्र शाळेत दोन विशेष शिक्षक मंजूर असून त्याची व्याप्ती वाढवितानाच केंद्र शाळेला एक विशेष शिक्षक नेमण्याचा निर्णय आजच्या बैठकीत घेण्यात आला. त्यानुसार सध्या कार्यरत असणाऱ्या ३१०५ विशेष शिक्षकांना सामावुन घेतले जाणार आहे. त्याच प्रमाणे गरजेप्रमाणे नवीन भरतीदेखील करण्याचा निर्णय या वेळी घेण्यात आला.

शिक्षकांना जुनी पेन्शनसंदर्भात समिती स्थापन राज्यात २००५ पुर्वी टप्पा अनुदानावर कार्यरत असलेल्या आणि २०१० पूर्वी १०० टक्के अनुदावानर असलेल्या २६ हजार ९०० शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत आजच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. या वेळी शिक्षक आमदार आणि संघटनांच्या प्रतिनीधींनी मते मांडली.

जुनी पेन्शन योजना लागू केल्यास येणाऱ्या आर्थिक भारासंदर्भात फेर पडताळणी करण्यासाठी समिती नेमण्यात आली. शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याचा निर्णय झाला होता. त्याबाबत शिक्षण विभागाने पाठविलेल्या फाईलवर मुख्यमंत्र्यांनी बैठकीतच स्वाक्षरी केली आणि समिती स्थापन झाल्याची घोषणाही केली.

अंशत: अपात्रतेबाबत कागदपत्रे जमा करा

## 'लाडकी बहीण'च्या लाभार्थ्यांना आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना सुरू करण्यात आलेली आहे. ऑनलाईन भरलेल्या अर्जाची महापालिकेच्या वतीने पडताळणी केली जात आहे. ज्या लाभार्थी महिलांची अपुरी कागदपत्रे किंवा शासनाच्या निकषानूसार कागदपत्रे नाहीत असे अर्ज अंशत: अपात्र करण्यात आले आहेत. ज्या महिला लाभार्थ्यांना अंशत: अपात्रेचा (पार्शली रिजेक्टेड) मेसेज आलेला आहे अशा लाभार्थी महिलांनी आपली कागदपत्रे तातडीने नजिकच्या प्रभाग समितीमध्ये जमा करण्याचे आवाहन महापालिकेच्या वतीने आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

महापालिका कार्यक्षेत्रात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने महापालिकेने विशेष नियोजन केले आहे. या योजनेंतर्गत प्रत्येक पात्र महिलेला तिच्या स्वतःच्या आधार लिंक केलेल्या बँक खात्यात डीबीटीद्वारे दरमहा दीड हजार इतकी रक्कम दिली जाणार आहे. उपायुक्त संतोष वारूळे यांच्या मार्गदर्शनाखाली पाच प्रभागामध्ये २० ठिकाणी मदत कक्ष उभारण्यात आली आहेत. पनवेल तालुक्यात एकुण ६० हजार महिलांनी या योजनेचे अर्ज भरले. यापैकी ४७ हजार ५३० अर्ज मंजूर झाले आहेत. त्यापैकी ८ हजार १८८ अर्ज अंशत: अपात्र (पार्शली रिजेक्टेड) झाले आहेत. अंशत: अपात्र झालेल्या लाभार्थी महिलांना त्यांनी नोंद केलेल्या मोबाईल क्रमांकावरती मेसेज पाठविण्यात आलेला आहे.

अशा लाभार्थी महिलांनी आपली उर्वरीत राहिलेली कागदपत्रे तातडीने आपल्या नजिकच्या प्रभाग कार्यालयांमध्ये जमा करावीत, जेणेकरून कागदपत्रे जमा झाल्यास या महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ देणे शक्य होईल.

## पेण येथे भाजप सांस्कृतिक सेलतर्फे भजन स्पर्धेला प्रारंभ

**पेण : प्रतिनिधी**

पेण विधानसभा मतदार संघ भारतीय जनता पक्षातर्फे भजनामृत भजन स्पर्धा २०२४ वारकरी भजन आणि संगीत भजन स्पर्धेचे ५,६,७ ऑगस्ट या तिन दिवशी सकाळी ९ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत हॉटेल सौभाग्य इन मेगा हॉल गणपती वाडी पेण येथे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन आमदार रविशेठ पाटील व माजी आमदार तथा भाजप जिल्हा उपाध्यक्ष धैर्यशील पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. आमदार रविशेठ पाटील यांच्या संकल्पनेतून माजी आमदार धैर्यशील पाटील, रायगड भाजप लोकसभा प्रमुख सतिश धारप यांच्या संकल्पनेतून भजनामृत भजन स्पर्धा २०२४चे आयोजन करण्यात आले असून ही भजन स्पर्धा मोफत असून श्रोत्यांना पवित्र श्रावणाच्या पहिल्या सोमवारपासुन तीन दिवस वारकरी भजन, संगीत भजनाची जणू पर्वणीच मिळाली आहे.




या वेळी जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, सरचिटणीस मिलिंद पाटील, पेण तालुका सरचिटणीस संजय डंगर, सोपान जांभेकर, डी.बी.पाटील आदी भाजप पदाधिकारी उपस्थित होते.

## शिर्की गावात फळरोप व छत्रीवाटप

**आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम**

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील शिर्की गावात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त अण्णाई शिर्की फार्मर प्रोड्युसर कंपनी लि.तर्फे गावचे उपसरपंच व कंपनीचे सचिव कल्पेश हरिश्चंद्र पाटील, कंपनीच्या अध्यक्षा वंदना म्हात्रे यांच्या वतीने शिर्की गावातील ग्रामस्थांना छत्री व कलमी हापूस आंबा रोपांची भेट देण्यात आली. पुढील दोन तीन दिवस प्रत्येकाच्या घरी जावून ही भेट देण्यात येणार असल्याचे अध्यक्ष वंदना म्हात्रे यांनी सांगितले.



आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी गावकऱ्यांना उपयोगी वस्तू आणून भेट देत असल्याचं सचिव व माजी उपसरपंच कल्पेश पाटील यांनी छत्री वाटप प्रसंगी सांगितले. आजपासून पुढील तीन चार दिवसात प्रत्येकाच्या घरी जाऊन हि भेट देणार असल्याचे कल्पेश पाटील यांनी सांगितले.

## खोपोली भाजप युवा मोर्चातर्फे आरोग्य शिबिर

**खोपोली : प्रतिनिधी**

भारतीय जनता युवा मोर्चा खोपोली शहर व रायगड हॉस्पिटल कर्जत यांच्या संयुक्त विद्यमाने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाच्या औचित्य साधून शहर मध्यवर्ती कार्यालयात आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन जिल्हा परिषद माजी आरोग्य सभापती नरेश पाटील व जिल्हा महिला मोर्चा अध्यक्ष अश्विनी पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.



डॉ. साहिल म्हात्रे डॉ. सरोज काळे व डॉ. अनिकेत पाटील यांनी या शिबिरात ६७ शिबिरार्थींची आरोग्य तपासणी केली. या शिबिराच्या उद्घाटनावेळी भाजप शहराध्यक्ष रमेश रेटरेकर, सरचिटणीस अजय इंगुलकर, विधानसभा समन्वयक हेमंत नांदे, शहर चिटणीस विकास खुरपुडे, सुनील नांदे, महिला मोर्चा शहराध्यक्ष अश्विनी अत्रे, सरचिटणीस सुप्रिया नांदे, खजिनदार विभावरी पाठक, जिल्हा कार्यकारणी सदस्य अपर्णा साठे, माजी सरपंच संदीप पाटील, युवा मोर्चा सरचिटणीस सिद्धेश पाटील, विनायक माडपे इत्यादी सह भाजपचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते या शिबिराला उपस्थित होते.

या आरोग्य शिबिरात ग्रामीण भागातील ग्रामस्थांनी उस्फूर्त प्रतिसाद दिल्याचे युवा मोर्चा शहराध्यक्ष डॉ. निकेत पाटील यांनी बोलताना सांगितले, पुष्पगुच्छ आण्ण्याऐवजी सामाजिक उपक्रम राबवावे असे आमचे नेते आमदार प्रशांत ठाकूर यांनी कार्यकर्त्यांना आवाहन केले होते त्या पार्श्वभूमीवर हे आरोग्य शिबिर आयोजित केल्याचे त्यांनी सांगितले.

## भावाच्या खूनप्रकरणी आरोपीस जन्मठेप

**माणगाव : प्रतिनिधी**

चुलत भावाचा खून केल्याप्रकरणी आरोपीस जन्मठेपेची शिक्षा माणगाव सत्र न्यायालयाने सुनावली आहे. ही घटना ही तळा तालुक्यातील मजगाव बौध्दवाडी येथे फिर्यादी हिरामण उर्फ हिरानंद पांडूरंग जगताप व पुतण्या आरोपी रवि जगताप यांच्या घराच्या पडवीत १६ फेब्रुवारी २०१९ रोजी म्हसळा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली होती.

या घटनेची थोडक्यात हकीकत अशी की, आरोपी रवि उर्फ रविंद्र सोनू जगताप याने फिर्यादी हिरामन उर्फ हिरानंद पांडूरंग जगताप यांच्याशी नारळाची झाडे तोडली यावरून झालेल्या वादाचा व फिर्यादी यांची पत्नी शिवीगाळी करते याचा राग मनात धरला. व त्यांचा मुंबईहुन आलेला मुलगा दिपक हिरामन जगताप यांस चाकू व कोयत्याने खांद्यावर व पोटावर वार करून, जिवे ठार मारले.

या गुन्ह्याचे दोषारोप पत्र जिल्हा व सत्र न्यायालय माणगाव येथे दाखल करण्यात आले. त्यानुसार खटल्याची सुनावणी मा. अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश सो., माणगाव-रायगड येथे झाली. घटनेतील गुन्हयाच्या शाबीतीनंतर यांनी घटनेतील आरोपींना दि. ६ ऑगस्ट २०२४ रोजी दोषी धरून जन्मठेप व १५००० रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. या प्रकरणी मयत दीपक जगताप यांस न्याय मिळाला म्हणून त्याच्या आई-वडिलांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

## खोपोली अग्निशमन दलात दोन फायर बुलेटचा समावेश

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली येथील नगर परिषदेच्या अग्निशामक दलात दोन फायर बुलेटचा समावेश करण्यात आला. या उपक्रमाचे उद्घाटन मुख्याधिकारी पंकज पाटील यांच्या हस्ते मंगळवारी करण्यात आले. या वेळी उपमुख्य अधीकारी व अग्निशमन दल विभाग प्रमुख गौतम भगले, जितेंद्र गोमाशी, रमेश गव्हाणे आदी उपस्थित होते.

खोपोली शहराचा दिवसेंदिवस झपाट्याने विकास होत आहेत, याचवेळी विविध आपत्तींना सामना करण्यासाठी सक्षम अग्निशामक दलाची गरज असते, त्याचवेळी आजूबाजूला असलेल्या भागात काही घटना घडल्यास खोपोली नगर परिषदेचा वेळीच पोचण्यासाठी ही




गरज लक्षात घेता राज्य सरकारने नगर परिषदेला दोन फायर बुलेट दिले आहेत. या बुलेट गाडीच्या माध्यमातून शहरातील अडचणीच्या ठिकाणी वाहन तत्काळ पोस्ट व आग आटोक्यात आणू शकते राज्य शासनाच्या या निर्णयामुळे खोपोली नगरपालिका आपत्ती व्यवस्थापनात एक नवा आधार मिळाल्याचे या उपक्रमाचे उद्घाटनावेळी मुख्याधिकारी पंकज पाटील यांनी आपले मत व्यक्त केले. तसेच शासनाचे आभारही मानले.

पान १ वरुन

## विरोधक विषाप्रमाणे काम करताहेत

आमदार संजय केळकर यांनी पुढे बोलताना म्हटले की, नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यापासून आपण जगात एक नंबरवर आहोत. आपल्या देशाचा सर्वांगीण विकास होत असताना आजूबाजूच्या राष्ट्रांनाही मोदीजींनी ताकद दिली आहे. काँग्रेसने त्यांच्या सत्ताकाळात काश्मिर ते कन्याकुमारीपर्यंत घोटाळे केले, मात्र आता सत्ता हाती लागत नाही हे पाहून समाजामध्ये तेढ करणारे वातावरण निर्माण करण्यात आले आणि जातीपातीचे राजकारण करून बेदाग मोदी सरकारला बदनाम करण्याचे षडयंत्र रचले गेले.

महिलांच्या सन्मानार्थ योजना राज्य सरकारच्या माध्यमातून अमलात आणल्या गेल्या आहेत, मात्र विरोधकांकडून त्या योजनांच्या बाबतीतही अपप्रचार करण्याचा डाव सुरू झाला आहे. विरोधकांनी हा रडीचा डाव बंद करावा, अशा शब्दांत आमदार केळकर यांनी खडे बोल सुनावले. एकेकाळी सरपंच झाला तरी आम्ही आनंदाने उडी मारून स्वागत करायचो. लोकसभेत पनवेलने मतांची मोठी आघाडी मिळवून दिली आहे. त्यामुळे पक्षाला अनुकूल वातावरण निर्माण झाले असून आता हा रायगड जिल्हा पूर्णपणे भाजपमय झाला आहे. उत्तर रायगड जिल्ह्यात सर्व जागा जिंकू, असा विश्वास आमदार केळकर यांनी व्यक्त केला.



प्रथम राष्ट्र, नंतर पक्ष आणि त्यानंतर स्वतः ही महत्त्वाची निष्ठा पक्षाने कधीही बदलली नाही. अंत्योदयाचा विचार पक्षाचा मूळ आधार असून कार्यकर्ता ही भाजपची संपत्ती आहे. ३० वर्षांपूर्वी काँग्रेसने लोकसभेच्या २४० जागा जिंकल्या. त्यानंतर कधीही काँग्रेसला एवढ्या जागा जिंकता आल्या नाहीत. नापास होऊनही आपण पास झालो आहोत असा अविर्भाव काँग्रेसकडून केला जात आहे. सकाळी एक जण उठून फक्त टीव्हीवर येतो आणि नुसताच हमरी तुमरीवर येतो. एक तर मी राहीन नाही तर तू राहशील अशी भाषा महापुरुष, संतांच्या भूमीत केली जात असल्याचे सांगत उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्री म्हणून कामे केली नाहीत, पण प्रकल्पांना स्थगिती देण्याचे काम मात्र चोख केले आहे, अशी टीका या वेळी आमदार केळकर यांनी केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा निवडणुकीत पराभव करण्याचे पाप काँग्रेसने केले आणि त्याच काँग्रेसने आता संविधानावरून देशात अशांतता माजवण्याचे काम केले. सत्ता आल्यावर दरमहा आठ हजार देण्याची घोषणा राहुल गांधी यांनी केली होती. मग ज्या राज्यात काँग्रेसची सत्ता आहे तेथील महिलांना केलेल्या घोषणेप्रमाणे का पैसे देत नाहीत, असा सवाल करत राहुल गांधी बेताल वक्तव्य करत असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले. त्यांचे पणजोबा, आजी, वडील देशाचे पंतप्रधान होते. मग त्यांनी जातीय जनगणना आणि आरक्षणावर का काम केले नाही, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

भाजप बोलतो ते करून दाखवतो आणि त्या अनुषंगाने केंद्र व राज्य सरकारकडून लोकांच्या विचारसरणीने कामकाज सुरू आहे. ही कामे जनतेपर्यंत पोहचवा, असे आवाहन कार्यकर्त्यांना करून विरोधक विखारी नरेटिव्ह पसरवण्याचे काम करत आहे, पण आता सुजाण जनता त्यांच्या भूलथापांना बळी पडणार नाही, असा विश्वासही आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केला.

प्रास्ताविकात जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी दिलेली जबाबदारी कार्यकर्त्यांनी यशस्वीपणे पार पाडली असल्याचे सांगितले आणि सर्वांचे त्याप्रती आभार मानले. जिल्ह्याची संघटनात्मक रचना मजबूत झाली आहे. म्हणूनच आपण लोकसभा निवडणुकीत यश मिळवले आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने संघटनात्मक रचनेने आपल्याला काम करायचे आहे. त्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सज्ज रहावे, असे आवाहनही त्यांनी केले.

प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हॅट्ट्रिक केल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला. या ठरावाला जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील यांनी सर्वांच्या वतीने अनुमोदन दिले. या वेळी सर्वांनी हात उंचावून आणि घोषणा देत अनुमोदन दिले.

कोकणात महायुतीने मिळविलेल्या यशाबद्दल मंत्री रवींद्र चव्हाण यांचा १०० टक्के स्ट्राईक राहिला असून त्यांच्या अभिनंदनाचाही ठराव या वेळी मांडून मंजूर करण्यात आला.

प्रदेश उपाध्यक्ष अतुल काळसेकर यांनी नवमतदार नोंदणी अभियानासंदर्भात माहिती दिली. या वेळी चारुशीला घरत यांनी निधन पावलेल्या व्यक्तींना श्रद्धांजली अर्पण करण्याचा शोक प्रस्ताव मांडला. या बैठकीचे सूत्रसंचालन दीपक बेहेरे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार अमरीश मोकल यांनी मानले.


## दुखवटा

### बाबाजी मोरे



**नागोठणे :** येथील नाभिक समाजाचे ज्येष्ठ कार्यकर्ते बाबाजी सखाराम मोरे (वय ८६) यांचे शुक्रवारी (दि. २) निधन झाले. त्यांच्या पश्चात सारिका महेंद्र जाधव ही विवाहित मुलगी, जावई व नातवंडे असा परिवार आहे. त्याचे दशक्रिया विधी रविवारी (दि. ११) उध्दर-पाली येथे तर उत्तरकार्य मंगळवारी (दि. १३) घरी होणार असल्याची माहिती मोरे कुटुंबीयांनी दिली.

### गंगुबाई पवार



**चौक :** गावातील गंगुबाई सीताराम पवार (वय ९७) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात तीन विवाहीत मुले, चार विवाहीत मुली, नातवंडे, परतुंडे आहेत. ग्रुप ग्रामपंचायत चौक उपसरपंच सुभाष पवार यांच्या त्या मातोश्री गंगुबाई सिताराम पवार यांच्या अंत्ययात्रेस परिसरातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक सांस्कृतिक क्षेत्रांतील मान्यवरांनी हजेरी लावून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रमांची भेट

## आंबिवली स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याचे लोकार्पण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आंबिवली स्मशान भुमीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम पूर्ण झाले असून या रस्त्याचे लोकार्पण आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्यसाधून सोमवारी करण्यात आले.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून पनवेल विधानसभा मतदार संघामध्ये अनेक विकासाची कामे मार्गी लागत आहेत. त्यानुसार त्यांच्या २५-१५ निधीमधून आंबिवली स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यात आले आहे. १२ लाख ६५ हजार रुपयांचा निधी बांधण्यात आलल्या या रस्त्याचे लोकार्पण सोमवारी झाले.

या वेळी भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, माजी उपमहापौर सीताताई पाटील, माजी उपसरपंच रमेश पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, शिवकर ग्रामपंचायती सरपंच आनंद ढवळे, पंचायत समितीचे माजी सदस्य राज पाटील, ग्रामपंचायत सदस्य अनंता पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## पं.स.मध्ये सामूहिक योजनांच्या लाभांचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल पंचायत समितीमध्ये सामूहिक लाभांच्या योजनांचे वाटप, विद्यार्थ्यांना वह्यावाटप आणि आरो प्लांटचा भूमिपूजन सोहळा सोमवारी झाला. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे आचित्यसाधून आयोजित केलेल्या या कार्यक्रमात त्यांच्या हस्ते साहित्यांचे वाटप तसेच आरओ प्लांटचे भूमिपूजन झाले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी तुमच्या शुभेच्छांमुळे मला अधिक काळ काम करण्याची प्रेरणा मिळत राहिल, असे प्रतिपादन केले.

पनवेल पंचायत समितीमध्ये समाजकल्याण विभाग २०२३-२४ अंतर्गत सामूहिक लाभाच्या योजनांचा वाटप कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. या वेळी मागासवर्गीय लाभार्थ्यांना समाज मंदिरासाठी सतरंजी, मंडप तसेच व्यायाम शाळेच्या साहित्यांचे वाटप आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान, आमदार प्रशांत ठाकूर यांनी वाढदिवसानिमीत्त 'बूके नको बूक द्या' असे आवाहन केले होते. या आवाहनाला चांगला प्रतिसाद लाभला असून या कार्यक्रमाचे औचित्यसाधून अनेकांनी वह्या देऊन आमदार प्रशांत ठाकूरांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वह्यांचे वाटप आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना करण्यात आले.

या वेळी त्यांनी पुस्तके देणाऱ्यांचे आभार मानून या वह्यांचे वाटप तालुक्यातील आदिवासी भागातील शाळांमध्ये करावे असे सांगितले तसेच आणखी वह्या लागल्यास श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळच्या वतीने देऊ असे जाहीर केले.



(छाया : विकास म्हात्रे, योगेश पाटील)



दरम्यान, या कार्यक्रमाच्या प्रारंभी रामकी कंपनीच्या वतीने देण्यात आलेल्या आरओ प्लांटच्या कामाचे भूमिपूजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमावेळी भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, माजी जि. प. सदस्य अमित जाधव, माजी पं. स. सदस्य भुपेंद्र पाटील, करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार, गटविकास अधिकारी संजय भोये, युवानेते हॅप्पी सिंग, शिवकर ग्रामपंचातीचे सरपंच आनंद ढवळे, मयुर कदम यांच्यासह पंचायत समितीचे अधिकारी, पदाधिकारी आणि कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.

## केदार भगत यांच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांना छत्रीवाटप

**पनपेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपचे पनवेल शहर उपाध्यक्ष केदार भगत यांच्या माध्यमातून प्रभाग क्रमांक १९मधील ज्येष्ठ नागरिकांना छत्री वाटपाचा कार्यक्रम करण्यात आला होता. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते ज्येष्ठ नागरिकांना छत्र्यांचे वाटप करण्यात आले.



लोकनेते दि.बा पाटील विद्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, ज्येष्ठ नेते श्रीनंद पटवर्धन, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, चारुशीला घरत, माजी नगरसेवक अजय बहिरा, महिला मोर्चा शहर अध्यक्ष राजश्री वावेकर, जिल्हा चिटणीस अमरीश मोकल, शहर उपाध्यक्ष अमित ओझे, युवा नेते हॅप्पी सिंग, मयुरेश खिस्मतराव, सपना पाटील, नीता मंजुळे, ॲड. मनोज म्हात्रे, केदार भगत, सुमित दसवते, मनोहर गडगे, हर्षद गडगे, संकेत दसवते, सचिन जाचक, रवी पारचे, संतोष वरतळे, जयेश दसवते, सचिन भगत, प्रमोद भगत, उज्वल पाटील, फिरोज शेख, नितेश भगत, ब्रिजेश बहिरा, आनंद गायकवाड, चिन्मय भगत, शेषनाथ गायकर, निलेश पाटील, नैनेश वाघीलकर, मंदार भगत, निकिता पाटील, गीतांजली भगत, संगीता पोतदार, सुनीता भगत, निर्मिती म्हस्कर, दीपाली म्हस्कर आदी उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या वाढदिवसाला इतरांचे आशीर्वाद आपल्याला भेटणे यासारखे दुसरे सौख्य नाही हे आशीर्वाद भाजप आणि केदार भगत यांच्यामुळे मला मिळाले. याबद्दल त्यांचे आभार मानतो असे सांगितले तसेच केदार भगत यांच्या माध्यामतून सातत्याने राबवण्या येणाऱ्या उपक्रमांचे कौतुक केले.

## कळंबोलीमध्ये वृक्षारोपण

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

शीख समाजाच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या ५०व्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपणाचा कार्यक्रम सोमवारी आयोजित केला होता. कळंबोलीमधील के.एल.ई कॉलेज जवळ हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते आणि आमदार निरंजन डावखरे यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले.

शीख समाजाच्या वतीने कळंबोली येथील के.एल.ई कॉलेजजवळील पनवेल-



सायन महामार्गावर ५० झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.

या वेळी माजी नगरसेवक हरेश केणी, बबन मुकादम, अमर पाटील, राजू शर्मा, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, मोनिका महानवर, भाजपचे कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, अमर ठाकूर, अमरजित सिंग आनंद, युवा नेते हॅप्पी सिंग, दिलीप बिस्ट, अतुल तांबे आदी शीख बांधव उपस्थित होते.

## पनवेलमध्ये रंगली सुश्राव्य मैफिल



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल, नादब्रह्म साधना मंडळ खारघर आणि पनवेल तालुका सांस्कृतिक सेलच्या वतीने पनवेल विधानसभा मतदार संघाचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त शास्त्रीय आणि उपशास्त्रीय संगीताची सुश्राव्य मैफिल आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट दिली.

ओम बोगांणे यांनी शास्त्रीय संगीत गायन या कार्यक्रमात सादर केले. या वेळी पंडीत उमेश चौधरी, वसंतशेठ पाटील, कृष्णा पवार, नारायणबुवा पाटील, मोतीराम कडू, जगदीश म्हात्रे यांच्यासह नादब्रम्हा साधना मंडळाचे शिष्य परिवार उपस्थित होते.

## एक झाड आईच्या नावे संकल्पनेनुसार खारघर टेकडीवर वृक्षारोपण

**खारघर : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या एक झाड आईच्या नावे या संकल्पनेनुसार व आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त केलेला आवाहनानुसार खारघर सेक्टर ५ येथील टेकडीवर वृक्षारोपण उपक्रम राबविण्यात आला.

शिव प्रतिष्ठान सामाजिक संस्थेचे अध्यक्ष व पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक शत्रुघ्न अंबाजी काकडे यांच्या पुढाकाराने १७० रोपटी ज्यात प्रामुख्याने वड, नारळ, पिंपळ, जांभूळ, कडूलिंब अशी रोपे लावण्यात आली. खारघर शहर मंडळ सरचिटणीस दीपक शिंदे यांनी एस.आय.ई.एस नेरूळ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनाच्या १२५ विद्यार्थ्यांना या उपक्रमात सहभागी करून घेतले.



महिला मोर्चा अध्यक्षा साधना पवार यांनी या उपक्रमासाठी ३० रोपट्याची व्यवस्था करून अनेक महिला कार्यकर्ते व पदाधिकारी यांना सहभागी करून घेतले.

खारघर शहर मंडल सरचिटणीस दीपक शिंदे यांनी मार्गदर्शन करताना म्हणाले की, वृक्ष जसे उंच उंच वाढत असतानासुद्धा आपली मुळे मात्र मातीत घट्ट रोवून असतात, त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी आयुष्यात उत्तम यश मिळवत असताना आपल्या आई-वडिलांना व गुरुना विसरता कामा नये. असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

एसआयईएस नेरूळच्या विद्यार्थ्यांनीसुद्धा आमदार प्रशांत ठाकूर साहेब यांच्या सामाजिक व पर्यावरण पूरक वृक्षारोपणाच्या आवाहनाचे कौतुक करून त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या व उत्तम नियोजनाबद्दल माजी नगरसेवक काकडे यांचे आभार मानले.

या वेळी आयोजक शत्रुघ्न काकडे, दीपक शिंदे, साधना पवार यांच्यासह जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक गुरुनाथ गायकर, राजेंद्र मांजरेकर, अजय माळी, शैलेंद्र त्रिपाठी,संतोष नारायणकर, अशोक पवार, मेघनाथ म्हात्रे, इराप्पा हुन्नूरकर, अंकिता वारंग,शोभा मिश्रा, मीनाक्षी अंथवाल, शामला सुरेश, सुशीला शर्मा, नंदा पानसरे, सोनल लाहा, सीमा खडसे, प्रिया दळवी, निर्मला यादव, गायत्री दुबे, भाग्यश्री खरपूरिया, सोमा बिस्वास, गायत्री महापात्रा, प्रिया हणमंते, रजनी शर्मा, जुमा चक्रवर्ती व डॉ. ज्योती जाधव, नूतन सिंग आदी उपस्थित होते.

## चित्रकला स्पर्धेत कार्तिकी आंग्रेचे सुयश





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त जाणिव सामाजिक ट्रस्टने या चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले होते. या चित्रकला स्पर्धेत संपूर्ण नवी मुंबईतून एकूण ६००हून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. यामध्ये पनवेलमधील कार्तिकी संदीप आंग्रे हिने चौथ्या गटामध्ये प्रथम क्रमांक मिळविला. तिला माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले. या वेळी तिचे वडील संदीप आंग्रेही उपस्थित होते.

पनवेल शहरातील आगरी समाज हॉल येथे भव्य चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत ज्युनिअर के.जी. ते पहिली, दुसरी ते चौथी, पाचवी ते सातवी आणि आठवी ते दहावी पर्यंत अशा चार गटात ही स्पर्धा झाली. या स्पर्धेत स्पर्धकांचा चांगला प्रतिसाद लाभला. सुमारे ६००हून अधिक मुलांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. या स्पर्धेचा निकाल याच ठिकाणी लगेच जाहीर करण्यात आला. त्यात विजेत्याला प्रमाणपत्र आणि भेट वस्तू देउन मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले तसेच स्पर्धेत सहभाग घेतलेल्यांनाही प्रमाणपत्र आणि भेट वस्तू देऊन त्यांना प्रोत्साहीत करण्यात आले.

## सुखम हॉस्पिटलमध्ये आरोग्य शिबिर

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करावे, असे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत सोमवारी (दि. ५) पनवेल शहरातील सुखम हॉस्पिटलमध्ये आरोग्य शिबिर घेण्यात आले.

यामध्ये रुग्णांना सीपीआर प्रशिक्षण देण्यात आले. तसेच सीबीसी, थायरॉईड, लिपिड प्रोफाईल, ब्लड शुगर, ईसीजी, बीपी इत्यादी तपासण्या करण्यात आल्या. यासोबतच आलेल्या सर्व रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टरांचा आरोग्यविषयक मार्गदर्शनही देण्यात आले.



**पनवेल : उज्वला उर्वेश कर्णिक आणि उर्वेश विजय कर्णिक यांनी खांदा कॉलनीमध्ये धनूस जॉय फूड हे मॅनुफ्रॅक्चर आणि डीहाड्रेटेड फूड्स प्रोडक्टचा व्यवसाय सुरू केला आहे. या दुकानाचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी झाले. त्यांनी कर्णिक दाम्पत्याचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी नगरसेवक एकनाथ गायकवार, अजय बहिरा, भाजप नेते भीमराव पोवार आदी उपस्थित होते.** (छाया : योगेश पाटील)




**पनवेल : लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त उरण पूर्व विभाग युवा अध्यक्ष प्रवीण घासे, शेखर तांडेल, शशी पाटील, प्रफुल्ल पाटील, रूपेश पंडित आदींनी शुभेच्छा दिल्या.**



**खारघर : आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त खारघरचा राजा संस्थेच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कार्यक्रमादरम्यान खारघरच्या राजाचे दर्शन घेतले. सोबत आयोजक विजय पाटील.**



**पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त भाजपचे रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग, जिल्हा सरचिटणीस रोशन चाफेकर, मिलिंद झुरे, सचिन मोरे, निलेश धुमाळ, वैभव कुलकर्णी आदींनी शुभेच्छा दिल्या.**

## संपादकीय

# संयम, सबुरीच योग्य

गेल्या चार-पाच दिवसांत निव्वळ आपल्याच नव्हे तर अनेक महत्त्वाच्या देशांच्या शेअर बाजारात पडझड झाली. या संबंधातील साऱ्या घडामोडींची नोंद नवख्या गुंतवणूकदारांना घ्यावीच लागेल, कारण जगभरात सध्या अनेक कारणांमुळे अस्थिरतेचे वातावरण आहे.

**काही वर्षांपूर्वी सर्वसामान्य मराठी माणूस भांडवली बाजाराच्या निर्देशांकातील बदलांची फारशी खबरबात ठेवत नसे, परंतु अलीकडच्या काळात हे चित्र बदलू लागले आहे. आता मध्यमवर्गीय मराठी माणूसही गुंतवणुकीच्या पूर्वापार चालत आलेल्या पर्यायांऐवजी म्युच्युअल फंड, शेअर बाजार या तुलनेने अधिक जोखीम असलेल्या पर्यायांकडे वळू लागला आहे. भांडवली बाजाराने सोमवारी अनुभवलेली गटांगळी नवख्या गुंतवणुकदारांना धडकी भरवून गेली असेल. भारतीय शेअर बाजार मंगळवारी सलग तिसऱ्या दिवशी घसरणीसह बंद झाला. जुन्या-जाणत्या गुंतवणूकदारांना अशी घसरण यापूर्वी अनेकदा घडल्याचा अनुभव असेल. भांडवली बाजाराचा निर्देशांक जसा खाली जातो तसाच तो वेगाने वरही येतो. नवखे गुंतवणूकदार मात्र याने गोंधळून जाऊ शकतात. भांडवली बाजाराच्या निर्देशांकातील बदलांची दखल गांभीर्याने कधी घ्यायची हेही गुंतवणूकदारांना समजून घ्यावे लागते. जागतिकीकरण झाल्यापासून जगभरातील अर्थव्यवस्था एकमेकांशी जोडल्या गेल्या असून एका ठिकाणच्या अस्थिरतेचे परिणाम दुसऱ्या ठिकाणी अधिक चटकन व तीव्रतेने पहायला मिळतात. गेले काही दिवस अमेरिकेत मंदीची चर्चा आहे. अमेरिकेतील घडामोडींचे परिणाम स्वाभाविकच जगभरात दिसून येतात. अमेरिकी सरकारने जुलै महिन्याची रोजगाराविषयीची आकडेवारी जाहीर करताच ती प्रतिकूल असल्याने खळबळ माजली. अमेरिकेतील बेरोजगारीचा दर जूनमध्ये ४.१ टक्के होता, तो जुलैमध्ये कमी होण्याऐवजी ४.३ टक्क्यांवर पोचला. अमेरिकेतील मंदीच्या सावटाच्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर ही आकडेवारी आल्यामुळे तेथील शेअर बाजारावर याचा मोठा परिणाम जाणवला. मंदीचे सावट गडद झाल्याची चर्चा सुरू झाली. आयटी क्षेत्रातील कंपन्यांमध्ये गेल्या वर्षी सुरू झालेली कर्मचारी कपात संपण्याची चिन्हे अद्यापही दिसत नाहीत. या वर्षीही या क्षेत्रातील अनेक बड्या कंपन्यांनी मोठ्या प्रमाणावर कर्मचारी कपात सुरूच ठेवली आहे. यात इंटेल आणि मायक्रोसॉफ्टसारख्या बड्या कंपन्यांचाही समावेश आहे. एका ताज्या अहवालानुसार यावर्षी जगभरातील ३८४ कंपन्यांमधून १ लाख २४ हजार ५१७ कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करण्यात आले आहे. काही कंपन्यांचे तर पूर्ण कामकाजच ठप्प झाले आहे. भारतातही या क्षेत्रात हेच चित्र आहे. दुसरीकडे बँक ऑफ जपानच्या व्याजदरात वाढीच्या निर्णयाने तेथील शेअर बाजारही सोमवारी गडगडला. जपानपाठोपाठ कोरिया आणि तैवान येथील शेअर बाजारांच्या निर्देशांकांचीही वेगाने घसरण झाली. जगातील अनेक घडामोडींचा हा परिणाम आहे. अस्थिर जागतिक अर्थव्यवस्था हे एक मोठे कारण आहेच. पण त्यासोबतच अमेरिकेत निवडणुकीचे वातावरण तापू लागले आहे याचीही भर आहे. इस्रायल-इराण युद्धाचे सावट जगावर घोंघावते आहे. 'हमास'च्या नेतृत्वाच्या हत्येचा बदला घेण्याची शपथ इराणने घेतली आहे. अमेरिकाही या युद्धातील सहभागाकरिता सरसावली आहे. यामुळे मध्य पूर्वेतील युद्धजन्य परिस्थिती आणखीनच गडद झाली आहे. युक्रेन-रशिया युद्धामुळे युरोपीय देशांची आर्थिक स्थिती बरी नाही. एकंदरच सध्या जगभरात फारसे कुठेही गुंतवणुकदारांसाठी सुरक्षित वातावरण नाही. या अवघ्या परिस्थितीचा फटका आपल्या शेअर बाजार निर्देशांकानाही बसला आहे. भयाच्या वातावरणातून सोमवारी बाजार दोन हजारांहून अधिक अंकांनी कोसळला. अनेक नव्या आणि छोट्या गुंतवणुकदारांना यातून संयम आणि सबुरीचा धडा घ्यावा लागेल.**

# आरोग्य महाशिबिर : रुग्णसेवेची अविरत परंपरा





**खबरबात**
नितीन देशमुख

पनवेलच्या खांदा कॉलनीतील सीकेटी महाविद्यालयात रविवारी झालेल्या आरोग्य महाशिबिरात १० हजारपेक्षा जास्त रुग्णांची सेवा करण्यात आली. यामुळे त्या दिवशी ज्ञानमंदिरात शिक्षणाबरोबरच आरोग्यसेवाही घडण्याचा अपूर्व योग जुळून आला. पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, भारतीय जनता पक्ष, साधू वासवानी मिशन पुणे आणि रायगड मेडिकल असोसिएशन यांनी हा योग जुळवून आणला.

आरोग्यम् धनसंपदा असे आपण नेहमीच म्हणतो. अर्थात आरोग्य हीच खरी संपत्ती आहे. आरोग्य चांगले असेल तर आपण काहीही करू शकतो. त्यामुळे आपल्या आरोग्याची काळजी घेणे हे महत्त्वाचे आहे, मात्र आजच्या जंक फूडच्या जमान्यात आरोग्याकडे दुर्लक्ष केले जाते. त्याचे परिणाम वृद्धावस्थेत तर भोगायलाच लागतात, पण आज तरुण पिढीलाही भोगावे लागत आहेत.

आज घड्याळ्याच्या काट्यावर धावणारा माणूस जोपर्यंत आजारी पडत नाही तोपर्यंत डॉक्टरकडे जात नाही. त्या वेळी उपचार करणे अवघड होते, पण आजार होण्यापूर्वीच त्याच्यावर उपाय योजना केल्यास त्यापासून बचाव होऊ शकतो. याची जाणीव असूनही सामान्य माणूस त्याकडे दुर्लक्ष करतो. आरोग्य तपासणी करत नाही. त्यामुळे एखादा आजार झाला तर त्या वेळी केलेल्या तपासणीवेळी आणखी व्याधी लागतात. या व्याधी टाळण्यासाठी वर्षातून एकदा तरी आरोग्य तपासणी गरजेचे आहे, मात्र अनेक लोक विशेषतः ग्रामीण भागातील माणूस दुर्लक्ष करतो. त्यामुळे या शिबिरातून त्याची तपासणी होऊन योग्य उपचार देण्यासाठी या शिबिराचे आयोजन दरवर्षी केले जात आहे.

भाजपचे रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकुर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, भाजप आणि रायगड मेडिकल असोसिएशन यांनी ५ ऑगस्ट रोजी खांदा कॉलनीतील सीकेटी महाविद्यालयात विनामूल्य आरोग्य शिबिर आणि मोफत औषधोपचार महाशिबिर आयोजित केले होते. या महाशिबिरात सकाळी ९ वाजल्यापासून ४ वाजेपर्यंत ३००हून अधिक वैद्यकीय तज्ज्ञांनी रुग्णांची तपासणी करण्यात आली. महाशिबिरात सर्वसाधारण रोग, बालरोग, महिलांचे आजार, त्वचारोग, हृदयरोग, दंतरोग, हाडांचे रोग, ईसीजी, मधुमेह, नाक-कान-घसा, आयुर्वेदिक, होमिओपॅथिक, क्षयरोग, कॅन्सर अशा विविध प्रकारच्या तसेच सर्व प्रकारच्या रक्त तपासण्या तज्ज्ञांमार्फत करून सल्ला आणि औषधोपचार मोफत करण्यात आले. त्याचबरोबर डोळ्यांची तपासणी व चष्मेवाटप, तसेच दिव्यांगांना प्रमाणपत्र, अपंगांना तीनचाकी सायकल, कर्णबधिरांना श्रवणयंत्र वाटप करण्यात आले. त्याचबरोबर आयव्हीएफ उपचार, तसेच अवयवदानाचे फॉर्म भरण्याची सुविधाही उपलब्ध करण्यात आली होती. याशिवाय अपंगांना दाखले व आयुष्यमान कार्ड, महात्मा फुले जनआरोग्य यासारख्या योजनांची कार्ड काढून देण्यात आली. या महाशिबिराचा फायदा १२ हजारपेक्षा जास्त नागरिकांनी घेतला.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे या शिबिरात आलेला रुग्ण पूर्णत: बरा होऊन गेला पाहिजे, असे मत असल्याने या अनुषंगाने त्यांच्यावर उपचार केले गेले. अनेक रुग्णांनी उपचार झाल्यावर प्रत्यक्ष भेटून कार्यकर्त्यांजवळ आभार व्यक्त केले. या वेळी आलेल्या रुग्णांसाठी भोजनाचीही व्यवस्था चांगली केली गेल्याने महिलांना घरी जाऊन जेवण करण्याचा त्रास वाचला. त्यांना शिबिरात व्यवस्थित तपासणी करून औषधे घेता आली. या शिबिरात उपचार घेणाऱ्यांना पंतप्रधान सुरक्षा विमा योजनेचा लाभही देण्यात आला.

लोकनेते रामशेठ ठाकूर हे गरीब कुटुंबात जन्मलेले आहेत आणि याची जाणीव त्यांनी कायम ठेवली आहे आणि तीच जाणीव त्यांच्या कुटुंबात रूजली आहे. त्यामुळे या कुटुंबाकडून नेहमीच चांगले कार्य करत कायम सामाजिक बांधिलकी जपली जात आहे. सन २००६पासून कोरोनाची दोन वर्षे अपवाद वगळता १६ वर्षे हे महाशिबिर अखंडपणे सुरू आहे. त्याचे नियोजन उत्तम असल्यामुळेच हा उपक्रम अविरतपणे चालू आहे, त्यामुळे या उपक्रमाला तोड नसून ही सेवा लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यामुळे या विभागाला मिळाली आहे. नावाने खूप दानशूर होतात, पण कर्तृत्वाने खरे दानशूर लोकनेते रामशेठ ठाकूर असल्याचे या शिबिराचे उद्घाटक माजी मंत्री व विद्यमान आमदार रविशेठ पाटील यांनी सांगून आमदार प्रशांत ठाकूर यांनी सेवेचे व्रत घेतलेच आहे, पण त्याचबरोबर येथील माणसाला काय आवश्यक आहे याची जाणीवही त्यांच्याकडे आहे. त्याप्रमाणे त्यांच्याकडे कामाचा वसा असून विधिमंडळातील ते एक बुलंद आवाज आहेत, असे गौरवोद्गारही त्यांनी काढले.



अनेकदा कामाचे कौतुक होत असते, पण देवाने दिले ते समाजासाठी देणे आपले कर्तव्य आहे. आपणही समाजाचे देणेदार लागतो या भावनेतून काम करण्याचा आमचा प्रयत्न असतो. त्यामुळे सामाजिक बांधिलकीला प्रथम प्राधान्य देत असतो असे सांगतानाच वाढदिवसाचे अभीष्टचिंतन करताना आमदार प्रशांत ठाकूर यांच्यावर असलेले प्रेम कायम वृद्धिंगत करा, असे आवाहन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले.



## बदलते तंत्रज्ञान

# आधार कार्ड हरवल्यावर 'या' सहा स्टेप्स करा फॉलो

सध्या आधार कार्ड प्रत्येक कामासाठी गरजेचं आहे, असं म्हणायला हरकत नाही. अगदी नोकरीवर रूजू होताना ते अगदी बँकेची ठराविक कामं करताना आधार कार्ड मागितलं जातं, पण आपल्याकडून अनेकदा हे महत्त्वाचं कागदपत्र गहाळ होतं. जर तुमचंही आधार कार्ड हरवलं असेल, तर आता घरबसल्या तुम्ही आधार क्रमांक किंवा नोंदणी क्रमांक सहज मिळवू शकता. त्यासाठी तुम्हाला पुढील स्टेप्स फॉलो कराव्या लागतील.



✻ अधिकृत संकेतस्थळाला भेट द्या : सर्वप्रथम गुगल ओपन करा आणि ड्रेस बारमध्ये http://www.uidai.gov.in टाईप करा. नंतर तुमच्यासमोर युनिक आयडेंटिफिकेशन अथॉरिटी ऑफ इंडिया (UIDAI)चे अधिकृत संकेतस्थळ येईल. हे अधिकृत संकेतस्थळ आहे, जिथे तुम्ही तुमच्या आधार कार्डाविषयीची संबंधित माहिती मिळवू शकता.

✻ रिट्रिव्ह लॉस्ट यूआयडी/ईआयडी : UIDAI अधिकृत संकेतस्थळाच्या होम पेजवर, Retrieve Lost UID/EID' हा पर्याय शोधा. हा पर्याय सहसा 'आधार सेवा' (Aadhaar Services) विभागात आढळतो. त्यावर क्लिक करा. तुमच्यासमोर एक नवीन पेज ओपन होईल. येथे तुम्ही हरवलेलं आधार कार्ड पुन्हा मिळविण्याची प्रक्रिया सुरू करू शकता.

✻ तुमची वैयक्तिक माहिती द्या : यामध्ये तुमचे पूर्ण नाव, ई-मेल आयडी, मोबाईल नंबरचा समावेश असेल. तुम्ही जो मोबाईल नंबर एंटर केला आहे तोच तुमच्या 'आधार'वर नोंदणीकृत आहे ना याची खात्री करून घ्या, कारण या नंबरवर OTP (वन-टाइम पासवर्ड) पाठविला जाईल.

✻ दोन पर्याय दिले जातील : जर तुम्हाला तुमचा आधार क्रमांक हवा असल्यास 'आधार क्रमांक' (यूआयडी) पर्याय निवडा. जर तुम्हाला नावनोंदणी क्रमांक हवा असल्यास आधार नोंदणी क्रमांक (ईआयडी) हा पर्याय निवडा.

✻ 'ओटीपी पाठवा'वर क्लिक करा : ओटीपी पाठवा या बटणावर क्लिक करा. तुमच्या आधारबरोबर लिंक करण्यात आलेल्या मोबाईल नंबरवर तुम्हाला सहा अंकी ओटीपी पाठविला जाईल. संकेतस्थळावर दिलेल्या फील्डमध्ये हा ओटीपी टाका. OTPबरोबर स्क्रीनवर दिसणारा सुरक्षा कोडदेखील टाकावा लागेल. त्यानंतर 'सबमिट करा'वर क्लिक करा. माहितीची पडताळणी केल्यानंतर आधार किंवा नोंदणी क्रमांक दिलेल्या ई-मेल पत्त्यावर किंवा मोबाइल क्रमांकावर पाठविला जाईल.

# हरित क्रांतीचे जनक डॉ. एम.एस. स्वामीनाथन

भारतीय अनुवंशशास्त्रज्ञ, आंतरराष्ट्रीय प्रशासक आणि कृषी शास्त्रज्ञ डॉ. एम.एस. स्वामीनाथन यांचा आज जन्मदिवस. भारतातील हरित क्रांतीमध्ये त्यांचा मोलाचा वाटा होता. कृषीप्रधान देशात कृषी क्षेत्रातील संशोधनासाठी त्यांनी एम.एस.स्वामीनाथन रिसर्च फाऊंडेशनची स्थापना केली.

७ ऑगस्ट १९२५ रोजी तामिळनाडूमधील कुंभकोणम येथे सांबशिवम स्वामीनाथन यांचा जन्म झाला. त्यांचे वडील डॉक्टर होते. स्वामीनाथन अवघ्या दहा वर्षांचे असताना वडिलांचे निधन झाले. सुरुवातीला वडिलांप्रमाणे स्वामीनाथनसुद्धा डॉक्टरी शिक्षणाकडे वळले, पण त्या वेळी बंगालमध्ये पडलेल्या भीषण दुष्काळामुळे त्यांना दुःख झाले. सुरुवातीपासूनच शेती क्षेत्राची आवड असलेल्या सांबशिवम स्वामीनाथन यांनी डॉक्टरी शिक्षण अर्धवट सोडले. त्यानंतर ते शेतकी विषयाकडे वळले. १९४४मध्ये त्रावणकोर विद्यापीठातून ते बीएससी पदवीधारक झाले. त्यानंतर १९४७मध्ये कोईंबतूर कृषी महाविद्यालयातून त्यांनी कृषी विषयात बीएससीची पदवी मिळवली. १९४९मध्ये स्वामीनाथन यांनी दिल्लीच्या इंडियन ग्रिकल्चरल रिसर्च इन्स्टिट्यूटमधून विशेष प्रावीण्यासह पदव्युत्तर शिक्षण घेतले. त्यानंतर स्वामीनाथन हे केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झाले. ते भारतीय पोलीस सेवेसाठीही पात्र ठरले, मात्र त्यांनी पोलीस ऑफिसर न होता कृषी क्षेत्रात संशोधन करण्याचा निर्णय घेतला.




## निमित्त

१९५२मध्ये स्वामीनाथन यांनी केंब्रिजच्या ॲग्रीकल्चर स्कूलमधून पीएचडी मिळवली. या वेळी त्यांचा संशोधनाचा विषय बटाटा होता. पदवी मिळवल्यानंतर स्वामीनाथन यांनी शेतीत करिअर करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी त्यांनी मद्रासच्या कृषी महाविद्यालयात (आताच्या तामिळनाडू कृषी विद्यापीठात) प्रवेश घेतला. येथे त्यांनी कृषी विषयातील पदवी संपादित केली. कृषी क्षेत्रातील अभ्यासाकडे वळण्याविषयी स्वामीनाथन यांनी एक आठवण सांगितली आहे. १९४३मध्ये केरळ विद्यापीठाचा विद्यार्थी असताना बंगालमध्ये दुष्काळ पडला होता. त्या वेळी प्रत्येकजण देशाच्या स्वातंत्र्यासाठी योगदान देत होता. बंगालमधील दुष्काळातून प्रेरणा घेत देशातील शेतकऱ्यांसाठी कार्य करण्याचा विचार करत त्यांनी कृषी क्षेत्राकडे वळण्याचा निर्णय घेतला. अभ्यासात हुशार असलेल्या स्वामीनाथन यांनी अभ्यासासोबतच खूप कष्ट उपसले. १९४९ ते ५० या कालावधीत त्यांनी नेदरलँड्स विद्यापीठात अनुवंशशास्त्र विभागाचे युनेस्कोचे फेलो म्हणून काम केले. त्यानंतर १९५२ ते ५३ या कालावधीत त्यांनी अमेरिकेतील विस्कॉन्सिन विद्यापीठाच्या अनुवंशशास्त्र विभागात संशोधन सहकारी म्हणून काम केले, पण स्वामीनाथन यांना त्यांच्या संशोधन कार्यात मदत होईल अशा कामाची गरज होती. अशातच आंतरराष्ट्रीय संस्थेत तांदळावर संशोधन करण्याची संधी त्यांना मिळाली. या ठिकाणी त्यांनी तांदळाच्या जपानी आणि भारतीय जातींवर संशोधन केले. त्यानंतर १९६५मध्ये कोशा येथील एका संस्थेत त्यांना नोकरी मिळाली. येथे त्यांना गव्हाच्या संशोधन कार्याची जबाबदारी देण्यात आली. त्याचबरोबर तांदळावरही त्यांचे संशोधन चालूच होते.

दरम्यानच्या काळात स्वामीनाथन आणि त्यांच्या सहकाऱ्यांना त्या वेळी भारतात आलेल्या डॉ. व्होरलॉग यांचे मार्गदर्शन लाभले. पुढे देशातील शेतकऱ्यांची दुरवस्था घालवण्यासाठी १८ नोव्हेंबर २००४मध्ये आयोगाची स्थापना करण्यात आली. डॉ. एम.एस. स्वामीनाथन हे या आयोगाचे अध्यक्ष होते. २००६पर्यंत या आयोगाद्वारे एकूण सहा अहवाल सादर करण्यात आले आहेत. या अहवालात आयोगाने शेतकऱ्यांच्या हालाखीची कारणे व त्यावर उपाय सुचविण्यात आले आहेत. डॉ. स्वामीनाथन यांच्या कार्याची दखल घेत त्यांना विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. अशा या महान व्यक्तिमत्वाचे २८ सप्टेंबर २०२३ रोजी निधन झाले.

## क्लिक...क्लिक...!



**मुरुड : पावसामुळे जंजिरा किल्ल्याचे निसर्गसौंदर्य बहरले असून उधाणात या किल्ल्यास लाटांचा मारा होतो.** (छाया : नितीन शेडगे)

## आरोग्य प्रहर

# रात्रीचे जेवण आणि सकाळचा नाश्ता कधी करावा? जाणून घ्या

सकाळचा नाश्ता हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे आणि सकाळच्या नाश्त्याचा थेट संबंध रात्रीच्या जेवणाच्या वेळेबरोबर केला जातो. रात्रीचे जेवण आणि सकाळचा नाश्ता हा ठराविक काळात करणे हे आरोग्यासाठी फायदेशीर आहे.



जेवणाच्या वेळेचा आरोग्यावर परिणाम दिसून येतो. चयापचय क्रिया आणि निरोगी जीवनशैलीसाठी रात्रीचे जेवण आणि नाश्ता यामध्ये ठराविक अंतर असणे महत्त्वाचे आहे. आहारतज्ज्ञ सल्लागार कनिक्का मल्होत्रा यांनी दिलेल्या माहितीनुसार रात्रीचे जेवण आणि नाश्ता यांच्यामध्ये अंदाजे १२ ते १४ तासांचे अंतर असावे. हा काळ उपवासाचा मानला जातो आणि यामुळे आपल्याला अनेक आरोग्याचे फायदे दिसून येतात.

चयापचय क्रिया सुधारते : १२-१४ तासांच्या या उपवास कालावधीत फक्त शरीरातील ग्लुकोजवर अवलंबून न राहता चरबीचा वापर वाढवून चयापचय क्रिया सुरळीत ठेवता येते. यामुळे लठ्ठपणा आणि मधुमेहाचा धोका कमी होतो.

हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधित आरोग्य सुधारते : रात्रीचे जेवण आणि नाश्ता यामध्ये १३ तासांचे अंतर ठेवल्याने हृदयाशी संबंधित आजारांचा धोका कमी होतो.

पचन क्रिया सुधारते : या अंतरामुळे पचनासाठी पुरेसा वेळ मिळतो, ज्यामुळे सिडिटीसारख्या समस्या उद्भवत नाही आणि शरीराला चांगले पोषक घटक मिळतात.

झोपेची गुणवत्ता सुधारते : रात्री लवकर जेवण केल्यामुळे झोपेची गुणवत्ता सुधारते आणि चांगली झोप येते.

रात्रीचे जेवण आणि नाश्त्यासाठी खालील वेळा आहेत.

रात्रीचे जेवण : संध्याकाळी ६ ते ८ वाजतादरम्यान रात्रीचे जेवण शरीरासाठी फायदेशीर असते. यामुळे पचनक्रिया सुरळीत राहते आणि चांगली झोप येते.

नाश्ता : सकाळी ७ ते ९ दरम्यान नाश्ता करावा. यामुळे दिवसभर चयापचय क्रिया सुरळीत राहते आणि शरीराला आवश्यक ऊर्जा मिळते.

रात्रीचे जेवण आणि सकाळच्या नाश्त्यादरम्यान १२ तास नियमित काहीही न खाल्ल्यामुळे शरीराचे वेळापत्रक तयार होते आणि चयापचय क्रिया सुधारण्यास मदत होते.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे ही सामान्य मार्गदर्शक तत्वे आहेत, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. वैयक्तिक गरजा, जीवनशैली आणि संपूर्ण आरोग्याच्या परिस्थितीचा थेट परिणाम जेवणाच्या वेळेवर दिसू शकतो. त्यामुळे आहार आणि आहाराच्या वेळेत बदल करण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

# सुधागडमध्ये बिबट्याची दहशत

## अनेक बकऱ्या, जनावरे केली फस्त

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यात घोटवडे तसेच मानखोरा विभागात बिबट्याचा वावर असल्याने सर्वत्र भीतीचे वातावरण पसरले आहे. याबाबत स्थानिक लोकांकडून वनविभागाकडे तक्रार आल्याने तत्काळ दखल घेऊन या ठिकाणी वनविभागातर्फे सावधानतेचा इशारा व खबरदारीचे उपाय सांगण्यात आले असून त्या स्वरूपाचे फलकदेखील लावण्यात आले आहेत.

सुधागड तालुका वनपरिक्षेत्र अधिकारी अश्विनी तरसे तसेच वन्यजीव परिक्षेत्र अधिकारी विकास तरसे यांनी घटनास्थळी भेट देऊन सदर विषयाची माहिती घेतली असता, ग्रामस्थांकडून सांगण्यात आले की, या परिसरात बिबट्या फिरत आहे. त्यामुळे आमच्या बकऱ्या, गुराढोरांना धोका आहे. आमची जनावरे व बकऱ्या बिबट्याने मारली आहेत.

वनविभागाने त्यानुसार दखल घेऊन मागील चार दिवसांपासून उपाययोजना सुरू केली आहे. अश्विनी तरसे या स्वतः गेले चार दिवसांपासून या विभागात दिवसा व रात्री गस्त घालत आहेत तसेच वनपाल व वनरक्षक यांची टीम या विभागात कार्यरत ठेवली आहे.

रात्री बिबट्या गावात येऊ नये म्हणून वनरक्षकांकडे फटाके देऊन परिसराच्या आजूबाजूला रात्री १०,११,१२ दरम्यान फटाके वाजवण्याचा आदेश दिला आहे. त्यामुळे बिबट्या शिकारीसाठी गावात न येता लांब पळून जाईल त्यासाठी ही उपाययोजना करण्यात आली आहे.

### ही घ्या खबरदारी!

वनविभागाने सांगितले आहे की, खबरदारीचे उपाय म्हणून रात्री घराबाहेर पडू नका. रात्री कुत्रे जोरजोराने भुंकत असल्यास बिबट्याजवळ असण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे शेळ्या, मेंढ्या, गाय, म्हैस, कोंबड्या बंद गोठ्यात ठेवाव्यात. बिबट्या सहसा जाणीवपूर्वक माणसावर हल्ला करीत नाही. बिबट्याला हाकलण्यासाठी त्याला दगड मारू नये व त्याचा पाठलाग करू नये. बिबट्या आल्यास भांडी वाजवा, फटाके वाजवा, जोरजोराने आरडाओरड करा, घराच्या बाजूने रात्रीच्या वेळी लाईट चालू ठेवावी.



**बिबट्या आपल्या विभागात वावरत असल्याने आपल्यावर बिबट्याचा हल्ला होऊ नये म्हणून नियमांचे पालन करून काळजी घ्यावी, या परिसरात स्पीकरद्वारे रोज अनाउन्समेंट करण्यात येत आहे. काही संशय आल्यास वनविभाग हेल्पलाइन क्र.१९२६वर संपर्क करावा, वनपाल घोटावडे (९६६७९६१२२९) (७०३९०८१५२४/ ७७१००५४०२४) या क्रमांकावर संपर्क करावा.**

**–अश्विनी तरसे,**
**तालुका वन परिक्षेत्र अधिकारी**



## नांदगाव येथे अजगराकडून नऊ कबुतरे फस्त

**मुरुड : प्रतिनिधी**

तालुक्यातील नांदगाव येथील आडीपांगळे भागात सोमवारी (दि.५) सायंकाळी ७.३० वा.च्या दरम्यान एका मोठ्या अजगराने तेथील एका घरातील अंगणात असलेल्या कबुतरांच्या खुराड्यात घुसून किमान नऊ कबुतर फस्त केले.

कबुतरे आवाज काढून पळू लागल्याने मालकाने खुराड्याची तपासणी केली असता एक भला मोठा अजगर त्यांच्या नजरेस पडला. त्यांनी वनविभाग व सर्पमित्र संदीप घरत यांच्याशी संपर्क साधला. वनक्षेत्रपाल प्रियांका पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सर्पमित्र संदीप घरत व वनपाल संतोष रेवणे, आगरदांडा वनरक्षक किरण गायकर, चेतन चव्हाण, विशाल ढोबळे, दिनेश रोटकर, महिला वनरक्षक महिमा तराळ, सागर तडवी यांनी अजगराला जेरबंद केले. त्याला पिशवीत भरून प्रादेशिक विभागाच्या वन हद्दीत सोडण्यात आले.

## पं. आनंद भाटे आज पेणमध्ये

**पेण** : पंडित भीमसेन जोशी यांचे पट्ट शिष्य पंडित आनंद भाटे हे भाजप पेण, सुधागड, रोहा विधानसभा मतदारसंघ आयोजित भजनामृत २०२४च्या बक्षीस वितरणासाठी पेणमध्ये येणार आहेत.

भाजप सांस्कृतिक सेलतर्फे विधानसभा मतदारसंघात भजनामृत स्पर्धेचे दिनांक ५,६,७ ऑगस्ट रोजी आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेचे बक्षीस वितरण पंडित आनंद भाटे यांच्या हस्ते होणार आहे. दरम्यान रायगड भाजप उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांच्या आग्रहाखातर व सतीश धारप यांच्या स्नेहापोटी ते पेणमध्ये येणार आहेत.

## बॅटरी ऑपरेटेड फवारणी पंपासाठी अर्ज करण्यास मुदतवाढ

**रायगड** : २०२४–२५मध्ये बॅटरी ऑपरेटेड फवारणी पंपाचा पुरवठा करण्याकरिता इच्छुक व पात्र शेतकऱ्यांसाठी महाडिबीटी पोर्टलवर १४ ऑगस्टपर्यंत अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी mahadbt.maharashtra.gov.in farmer login या वेबसाईट वर अर्ज करावेत.

## वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्या वाढली आहे. सोमवारी (दि.५) वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वाहतुकीचे नियमभंग करणाऱ्या एकूण ५४१ चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून पाच लाख १० हजार ७०० रुपये इतका दंड आकारला आहे.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, माझ्या अशीलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या जमीन मिळकती सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करून, १) सौ. जान्हवी सुंदीप जागसिया यांच्यानावे अधिकार अभिलेखी नमूद असलेल्या भोगवटाधारकाकडून विकत घेण्याचे इच्छित आहेत. ज्यांचे सविस्तर वर्णन खालील परिशिष्टा मध्ये केलेले असून, यापुढे या जमिनीस संक्षिप्तपणे 'सदरहू मिळकती' असे उल्लेखलीले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे– उसर्ली बुद्रुक, ता पनवेल व जिल्हा रायगड**

| अनु.क्र | गट क्रमांक/ सर्व्हे क्रमांक | हिस्सा क्रमांक | एकूण क्षेत्र हे. आर. चौ.मी | भोगवटाधार |
|---|---|---|---|---|
| १ | २० | २ | ०–२५–०० | सौ. जान्हवी सुंदीप जागसिया |

तरी वरील सदरहू मिळकती बाबत, अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, इजमेंट, समझोता करार, साठेकरार, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत, खाली सही करणार, खरेदीदारांचे वकील यांच्या खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह, लेखी हरकती रजिस्टड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे, मुदतीत हरकती प्राप्त न झाल्यास, सदर मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत, असे समजून आमचे अशील सदर मिळकती संदर्भातील सर्व व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

**दिनांक : ०७.०८.२०२४**
**ठिकाण : मु. पनवेल जि. रायगड**

**सही /–**
**ॲड. मनीष आर बोहरा**

पत्ता :– १०४,१४२अ, धनश्री बिल्डिंग, एम.सी.सी.एच सोसायटी, मु. पनवेल जि. रायगड ४१० २०६ मोबाईल नं. ९७०२३५११११/७०२१७७९६७९



### पाहिजेत

शासकीय अध्यापक महाविद्यालय पनवेल येथे सन २०२४ २०२५ या शैक्षणिक वर्षासाठी एम.एड (स्वयं सहाय्यित) व बी.एड या अभ्यासक्रमांसाठी अंत्यत तात्पुरत्या स्वरुपात घड्याळी तासिका तत्वावर खालील विषयांकरिता सहाय्य प्राध्यापक पदावर नियुक्तीसाठी थेट मुलाखत आयोजित केली आहे.

| अ.क्र | अभ्यासक्रम | पदनाम | विषय | पदसंख्या | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|---|
| १ | बी.एड | स. प्राध्यापक | इग्रंजी | १ | UGC, NCTE, University यांनी निर्धारित केलेल्या नियमानुसार |
| २ | बी.एड | स. प्राध्यापक | इतिहास | १ | UGC, NCTE, University यांनी निर्धारित केलेल्या नियमानुसार |
| ३ | बी.एड | स. प्राध्यापक | ICT | १ | UGC, NCTE, University यांनी निर्धारित केलेल्या नियमानुसार |
| ४<br>५<br>६<br>७ | एम.एड (स्वयं)<br>एम.एड (स्वयं)<br>एम.एड (स्वयं)<br>एम.एड (स्वयं) | स. प्राध्यापक<br>स. प्राध्यापक<br>स. प्राध्यापक<br>स. प्राध्यापक | Sem-I to Sem - IV All Subject as per Workload | १<br>१<br>१<br>१ | UGC,NCTE, University यांनी निर्धारित केलेल्या नियमानुसार |

इच्छुक उमेदवारांनी संपूर्ण माहितीसह आपला अर्ज आवश्यक स्व स्वाक्षरीत छायाप्रती जोडून महाविद्यालयात दिनांक १९/०८/२०२४ रोजी सकाळी ठीक ११ वाजता स्व–खर्चाने महाविद्यालयात उपस्थित रहावे. सोबत मूळ कागदपत्रे ठेवावीत.

वरील तासिका तत्वावरील नियुक्ती ही या शैक्षणिक वर्ष २०२४–२०२५ या वर्षाकरिता मर्यादित असून त्यांचे मानधन हे घड्याळी तासिकानुसार शासन निर्णयानुसार देय राहील.

**प्राचार्य**
**सही/-**
**(डॉ. रमा भोसले)**
**शासकीय अध्यापक महाविद्यालय पनवेल**



### पाहिजेत

अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन अल्पसंख्याक मुलींचे वस्तीगृह, पनवेल. साठी निव्वळ कंत्राटी पद्धतीने तात्पुरत्या स्वरूपात भरती करणेसाठी खालील पदांसाठी अर्ज मागवण्यात येत आहे.

| अ.क्र | पदनाम | संख्या | किमान पात्रता | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | अधीक्षक | १ | कोणत्याही शाखेचा पदवीधर व संगणक जान | महिला उमेदवार राखीव |
| २ | लिपिक | १ | दहावी पास टंकलेखन व संगणक ज्ञान आवश्यक | महिला उमेदवार राखीव |
| ३ | शिपाई | १ | किमान चौथी पास | महिला उमेदवार राखीव |
| ४ | सफाई कामगार | २ | किमान चौथी पास | महिला उमेदवार राखीव |
| ५ | पहारेकरी | ४ | किमान चौथी पास | महिला उमेदवार राखीव |

सदर पदांकरिता कंत्राटी पद्धतीने मानधन शासन निर्णय / वस्तीगृह –२०१२ /प्र.क्र.–१६८ / का.८ मंत्रालय मुंबई. २१/०६/२०१३ अन्वये राहील. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या (mdd. maharashatra.gov.in) वर उपलब्ध आहे. संपूर्ण अर्ज माहितीसह तसेच साक्षाकित प्रमानपत्रासह स्वीकारण्याचा अंतिम **दिनाक:–१०/०८/२०२४** असून मुलाखतीसाठी रविवार **दिनांक ११/०८/२०२४** रोजी सकाळी ११:०० वाजता उपस्थित राहावे.

पता – शासकीय अल्पसंख्याक मुलींचे वस्तीगृह, पनवेल.
प्राचार्य – शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल.
NH-४, एस. टी. स्टेंड जवळ, पनवेल.

**सही/–**
**अध्यक्ष**
**अल्पसंख्याक मुलींचे वस्तीगृह, पनवेल.**



### ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद
**ता. पनवेल, जि. रायगड**
**(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९)**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पालीदेवद ग्रामपंचायतीकडील कर आकारणी नोंद वहीतील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

**जुलै २०२४**

| अ.क्र. | मालमत्ता घेणाऱ्याचे नाव | मालमत्ता देणाऱ्याचे नाव | दस्तऐवज अनुक्रमांक | दस्तऐवज दिनांक | मालमत्ता वर्णन |
|---|---|---|---|---|---|
| १ | मनीषा सुनीलराज कनकधर / सुनीलराज राजाराम कनकधर | बाळकृष्ण सुदाम कदम | पवल१–४६४३– २०२४ | १४/०६/२०२४ | सदनिका क्र. ए १०६, पहिला मजला, साक्षी पार्क २, बि.नं.०५ को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| २ | लक्ष्मण दगडू चाळके / प्रिया लक्ष्मण चाळके | रुकमा बापू कांबळे | पवल१–४६७५– २०२४ | १९/०६/२०२४ | सदनिका क्र. एच २०४, दुसरा मजला, समृध्दभूमी को.हौ.सो. मौजे पालीदेवद |
| ३ | शर्मिला पी. बासू | अंजली राजेश श्रीवास्तव / राजेश कुमार श्रीवास्तव | पवल२– १८५२७–२०२३ | २३/१०/२०२३ | सदनिका क्र. १०१, पहिला मजला, बि.नं.३, स्वागत कॉप्लेक्स, सोमनाथ को.हौ.सो. मौजे पालीदेवद |
| ४ | संजय सभाजित सिंह / दुर्गावतीदेवी संजय सिंह | दिपक दत्तात्रेय भगत | पवल ४–१३३९४–२०२१ | ८/१२/२०२१ | सदनिका क्र.१०४, पहिला मजला, साई पार्वती इमारत, मौजे पालीदेवद |
| ५ | शंमुगा सतिश मुथ्थुपांडी | मयत शिवाजी ज्ञानेश्वर बोंबले यांचे वारस १. सुनिता शिवाजी बोंबले २. प्रतिक शिवाजी बोंबले ३. क्षितीज शिवाजी बोंबले | पवल१–४२७३– २०२३ | १९/०५/२०२३ | सदनिका क्र. ००१, तळ मजला, न्यू सिध्दीविनायक को.हौ.सो. मौजे पालीदेवद |
| ६ | मुन्नी नझीम अहमद | आयेशाबी सुलतान अहमद शेख | पवल३–८१५८– २०२४ | २५/०४/२०२४ | दुकान नं.११, तळ मजला, पुष्प कलश, मौजे शिलोत्तर रायचूर |
| ७ | मोहन व्दारिका राणा / राजेश कुमार राणा | राजेश यल्लाप्पा भोसले | पवल–२–१९६५२–२०२३ | ७/११/२०२३ | सदनिका क्र.१२, दुसरा मजला, बि.नं.१, सहारा कॉम्प्लेक्स को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| ८ | प्रशांत धर्माजी वाघ | पुरुषोत्तम पोषान्ना गुवा | पवल१–४६९०– २०२४ | १८/०६/२०२४ | सदनिका क्र.००१, तळ मजला, सी विंग, निलांबरी को.हौ. सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| ९ | मनोज भानजीभाई वेटकोली / हिना मनोज वेटकोली | जयसिंग नामदेव जाधव | पवल३–६१६४– २०२० | ८/०९/२०२० | सदनिका क्र. ए२०१, दुसरा मजला, ए विंग, कार्तिक्य गार्डन को.हौ.सो. मौजे पालीदेवद |
| १० | हणमंत कृष्णा बेबले / उर्मिला हणमंत बेबले | मे. आगा रियालिटी तफे तौसिफ जलालुद्दीन आगा | पवल२–१९२७२– २०२३ | १/११/२०२३ | सदनिका क्र. ३०५, तिसरा मजला, ओम साई इन्क्लेव्ह, मौजे पालीदेवद |
| ११ | मंगेश गणपत जाधव | मनोज गणपत जाधव | पवल१–५०७७– २०२४ | १/७/२०२४ | सदनिका नं.२०२, दुसरा मजला, सिध्दी को. हौ.सो. मौजे पालीदेवद |
| १२ | अजय कंटेप्पा हैगर / शोभा अजय हैगर | देविदास हिराजी गावंड | पवल३–६६७०– २०२४ | ४/४/२०२४ | सदनिका क्र.१५, दुसरा मजला, बि.नं. ए/२, युगांतक को.हौ.सो. मौजे पालीदेवद |
| १३ | धर्मेद्र मोठनलाल बघेल | विजया बबन बोंबले | पवल१–५२३५– २०२४ | ५/७/२०२४ | मालमत्ता क्रमांक १३५, मौजे शिलोत्तर रायचूर. |
| १४ | राज रमेश चव्हाण / रेश्मा रमेश चव्हाण | सुदलैमणी / शेल्लाकणी सुदलैमणी | पवल२–८४२४– २०२४ | २४/०४/२०२४ | सदनिका क्र.१०१, पहिला मजला, माऊली कृपा, मौजे पालीदेवद |
| १५ | अजगरअली इब्राहिम सय्यद हकीम / लतिफाबी अजगरअली सय्यद | प्रशांत तारानाथ शेट्टी | पवल२–९४९०– २०२० | ४/११/२०२० | सदनिका क्र. १०१, पहिला मजला, ए विंग, बि.नं.५, साई इन्क्लेव्ह को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर. |
| १६ | विवेक गोपीनाथ मानकर | मालती संदीप शेजवळ / संदीप बाबूराव शेजवळ | पवल२–७३९३– २०२४ | १०/४/२०२४ | सदनिका क्र. २०२, दुसरा मजला, बि.नं.४, जे विंग, साई इन्क्लेव्ह को.हौ.सो, मौजे शिलोत्तर रायचूर |
| १७ | उत्कर्षा उमेश चौधरी | उत्कर्षा उमेश चौधरी / उमेश रमण चौधरी | – | – | सदनिका क्र. २०२, दुसरा मजला, बि.नं.१, ए विंग, स्वानंदभूमी को.हौ.सो, मौजे पालीदेवद |

वरीलबाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पालीदेवद ग्रामपंचायत कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असल्यास सदर नोटीसीच्या प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्रामपंचायतीच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९ नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/–**
**(श्री. एन. जी. केणी)**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/–**
**(सौ. योगिता राजेश पाटील)**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल. जि. रायगड**



### जाहीर नोटीस

महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० चे कलम १०१ खाली दावा नोटीस ज्या अर्थी अर्जदार इंडिया बुल्स ग्रीन्स तुलीप को–ऑप हौ. सोसायटी लि. पोस्ट– अजिवली, तालुका–पनवेल. जिल्हा– रायगड या संस्थेने या कार्यालयाकडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये खालील सभासदांन विरुद्ध थकीत मेन्टेनन्सचा भरणा केला नसल्याने नमूद करून वसुली प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे.

त्यानुसार या कार्यालयात वेळोवेळी सुनावणी ठेवण्यात आली. तथापि खालील नमूद सभासदांना सुनावणी नोटीसची पोहोच होत नसल्याने तसेच नोटीस पोहोज गैरअर्जदार हजर राहिले नसल्याने नैसर्गिक न्याय तत्वानुसार म्हणणे दाखल दाखल करण्यासाठी जाहीर नोटीस देण्यात येत आहे. या जाहीर नोटीसीव्दारे आपणास पुन्हा एक संधी देण्यात येत असून सदर दाव्याबाबत अंतीम सुनावणी दिनांक २१/०८/२४ रोजी सकाळी ११: ३० वाजता ठेवण्यात आली असून सदर सुनावणी आपण स्वतःवा आपले प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहावे. आपण गैरजर राहिल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याचा निकाल केला जाईल व नंतर आपले कोणतेही म्हणणे ऐकून घेतले जाणार नाही व अर्जाची सुनावणी एकतर्फी चालविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | दावा क्रमांक | गैरअर्जदार/फ्लॅट नं. | कर्ज प्रकार | थकीत रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | ४७/२०२४ | अशोक कुमार लालचंद जैन – १४/३६०४ | मेन्टेनन्स | १,१०,७५०/– |
| २ | ३८/२०२४ | पल्लवी विजय फाळके – १५/३६०१ | मेन्टेनन्स | ९८,३२९/– |
| ३ | ३९/२०२४ | विक्रम सास्सोन – १५/३६०८ | मेन्टेनन्स | ९८,३२९/– |
| ४ | ७५/२०२४ | मंजुळा जैन – १४/३०१ | मेन्टेनन्स | ९७,५५९/– |
| ५ | ८७/२०२४ | Zerxes Irani – १४/३०६ | मेन्टेनन्स | ९६,३४३/– |
| ६ | ८५/२०२४ | सुन्दीप आरी – १४/७०२ | मेन्टेनन्स | ९६,३४३/– |
| ७ | ७१/२०२४ | जायालाकाश्मी सेल्वान – १४/१२०१ | मेन्टेनन्स | ९६,३४३/– |
| ८ | ७६/२०२४ | निरज थांकी – १४/१२०५ | मेन्टेनन्स | ९६,३४३/– |
| ९ | ७७/२०२४ | पुनीत अगरवाल – १४/१३०१ | मेन्टेनन्स | ९६,३४३/– |
| १० | ८८/२०२४ | पुनीत अगरवाल – १४/१३०२ | मेन्टेनन्स | ९६,३४३/– |
| ११ | ७८/२०२४ | पुष्कर भसीन – १४/१९०१ | मेन्टेनन्स | ९६,३४३/– |
| १२ | ७९/२०२४ | डॉ. राजेश पुरुषोत्तम – १४/२५०१ | मेन्टेनन्स | ९६,३४३/– |
| १३ | ७४/२०२४ | M and Heenjig Export Pvt.Ltd. –१४/२७०२ | मेन्टेनन्स | ९६,३४३/– |
| १४ | ८१/२०२४ | वासुदेव बहनानी – ८१/३००१ | मेन्टेनन्स | ९६,३४३/– |
| १५ | ७७/२०२४ | M and S Emmdee Developers –१४/३१०१ | मेन्टेनन्स | ९६,३४३/– |
| १६ | ८३/२०२४ | प्रदीप कोलाप – १४/३२०१ | मेन्टेनन्स | ९६,३४३/– |
| १७ | ३३/२०२४ | Ashfaque Haji Bilal Supriya – १५/८०३ | मेन्टेनन्स | ८२,२१५/– |
| १८ | ४०/२०२४ | Shankarsun G. Sahu – १५/९०७ | मेन्टेनन्स | ८१,५७५/– |
| १९ | ४६/२०२४ | पाटील – १५/२००२ | मेन्टेनन्स | ८१,५७५/– |
| २० | ३४/२०२४ | नविन कुमार – १५/२०६ | मेन्टेनन्स | ८०,३५९/– |
| २१ | ३५/२०२४ | गौरव समीर राव – १५/७०२ | मेन्टेनन्स | ८०,३५९/– |
| २२ | ७७/२०२४ | चिंचू सारीन – १५/८०४ | मेन्टेनन्स | ८०,३५९/– |
| २३ | ३७/२०२४ | फिरोज असलम खान – १५/१२०२ | मेन्टेनन्स | ८०,३५९/– |
| २४ | ३६/२०२४ | श्रद्धा जगपती – १५/१२०६ | मेन्टेनन्स | ८०,३५९/– |
| २५ | ४५/२०२४ | कमल प्रकाश शर्मा – १५/१९०७ | मेन्टेनन्स | ८०,३५९/– |
| २६ | १५/२०२४ | भाविन शाह – १५/२७०२ | मेन्टेनन्स | ८०,३५९/– |
| २७ | ४८/२०२४ | अब्बासली सज्ञाद साया – १५/२७०३ | मेन्टेनन्स | ८०,३५९/– |
| २८ | २९/२०२४ | Veetrag Bafna – १५/३३०५ | मेन्टेनन्स | ८०,३५९/– |
| २९ | ३०/२०२४ | गौतम सराफ – १५/३४०७ | मेन्टेनन्स | ८०,३५९/– |
| ३० | ९१/२०२४ | दिनेश रामदास थोरात – १५/३२०२ | मेन्टेनन्स | ७९,८५९/– |
| ३१ | ६६/२०२४ | तेज प्रताप बिस्त – १६/९०१ | मेन्टेनन्स | ७९,६५६/– |
| ३२ | ५२/२०२४ | सुरेंद्र कुमार – १६/७०३ | मेन्टेनन्स | ७८,४९६– |
| ३३ | ५९/२०२४ | राजीव पोददार – १६/१०८ | मेन्टेनन्स | ७८,४४०/– |
| ३४ | ६८/२०२४ | केयूर उदय कापडिया – १६/९०४ | मेन्टेनन्स | ७८,४४०/– |
| ३५ | ५७/२०२४ | स्नेहल स. म्हामुणकर – १६/१२०५ | मेन्टेनन्स | ७८,४४०/– |
| ३६ | ४९/२०२४ | मल्लाप्पा नाटेकर – १६/२२०४ | मेन्टेनन्स | ७८,४४०/– |
| ३७ | ६४/२०२४ | सुजेत सदानंद पाटील – १६/३३०५ | मेन्टेनन्स | ७८,४४०/– |
| ३८ | ५१/२०२४ | M and S Hotel Mahim Place – १६/३४०४ | मेन्टेनन्स | ७८,४४०/– |
| ३९ | १३०/२०२४ | मनिष कुमार – १४/२५०३ | मेन्टेनन्स | ८५,५९४/– |
| ४० | १३५/२०२४ | भास्कर चौधरी – १४/२८०३ | मेन्टेनन्स | ८५,५९४/– |
| ४१ | १३३/२०२४ | कंटा देवी पान्सरी – १४/३००४ | मेन्टेनन्स | ८५,५९४/– |
| ४२ | १२५/२०२४ | अरिंदम सिन्हा – १४/११०२ | मेन्टेनन्स | ८४,३७८/– |
| ४३ | १०७/२०२४ | शालीन माधवानी – १६/१४०६ | मेन्टेनन्स | ७८,१९२/– |
| ४४ | १०५/२०२४ | उमा लाखिमचंद – १६/१५०२ | मेन्टेनन्स | ७८,१९२/– |
| ४५ | १०४/२०२४ | चेतन साबदे – १६/१६०३ | मेन्टेनन्स | ७८,१९२/– |
| ४६ | १११/२०२४ | Henry Almeida / SubiAlmeida –१६/१६०६ | मेन्टेनन्स | ७८,१९२/– |
| ४७ | १००/२०२४ | रशिदा माला – १६/२२०२ | मेन्टेनन्स | ७८,१९२/– |
| ४८ | ११५/२०२४ | मिना मिलिंद कांबळे – १६/२४०३ | मेन्टेनन्स | ७८,१९२/– |
| ४९ | ११८/२०२४ | भारती मोहन पवार – १६/३२०२ | मेन्टेनन्स | ७८,१९२/– |
| ५० | ११४/२०२४ | कोमल राज – १६/३२०३ | मेन्टेनन्स | ७८,१९२/– |
| ५१ | ११९/२०२४ | अजय जैन – १६/३२०७ | मेन्टेनन्स | ७८,१९२/– |
| ५२ | ११६/२०२४ | Nout Sana Kadiri Desai – १६/३५०२ | मेन्टेनन्स | ७८,१९२/– |
| ५३ | १०३/२०२४ | रमेश अक्केला – १६/२२०३ | मेन्टेनन्स | ६९,००८/– |
| ५४ | १३९/२०२४ | Jamshyad Homavazir – १४/२०१ / Yasim Homavazir | मेन्टेनन्स | ६३,५०५/– |
| ५५ | १४३/२०२४ | अमी भोज – १४/१४०१ | मेन्टेनन्स | ६१,५२०/– |
| ५६ | ९७/२०२४ | आदिल केकी कोतवाल – १५/३५०५ | मेन्टेनन्स | ५२,१४६/– |
| ५७ | १४१/२०२४ | विलास तिडके – १४/११०५ | मेन्टेनन्स | ५१,२८४/– |
| ५८ | १४०/२०२४ | विलास ग. तिडके – १४/११०४ | मेन्टेनन्स | ४५,२६१/– |
| ५९ | ९३/२०२४ | नविन जयप्रकाश – १५/३१०६ | मेन्टेनन्स | ४२,५७१/– |
| ६० | १०९/२०२४ | पुष्पा पडवळ – १६/२३०५ | मेन्टेनन्स | ४२,१९५/– |
| ६१ | ९८/२०२४ | Puja Bugga –१५/१६०१ | मेन्टेनन्स | ३९,५६८/– |
| ६२ | १२७/२०२४ | Emema Raju / Albert Raju –१४/१००६ | मेन्टेनन्स | ३६,९०५/– |
| ६३ | १०६/२०२४ | विकास जैन – १६/२७०४ | मेन्टेनन्स | ३४,९१९/– |
| ६४ | १०८/२०२४ | अविनाश निवारती/सिमा निवारती – १६/२१०४ | मेन्टेनन्स | ३३,६७७/– |
| ६५ | १०२/२०२४ | अनंत सिताराम जाधव – १६/३६०१ | मेन्टेनन्स | ३३,३३९/– |

दिनांक : ५/०८/२०२४

शिक्का

**सही/–**
**(श्रीमती भारती काटुळे)**
**सहाय्यक निबंधक**
सहकारी संस्था, पनवेल

## निवडक

### झाड कोसळल्याने टेम्पोचे नुकसान



**नवीन पनवेल :** नवीन पनवेल शहरातील आदई सर्कल जवळ एक झाड टेम्पोवर कोसळल्याने यात टेम्पोचे नुकसान झाले आहे. यामुळे थोड्या फार प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. रविवारी सकाळी नवीन पनवेल शहरातील इंदुसिंद बँकेच्या समोर एक मोठे झाड एका टेम्पोवर कोसळले. यात टेम्पोचे मोठे नुकसान झाले. याची माहिती अग्निशमन दलाला देण्यात आली. अग्निशामक दलाच्या जवानांनी हे झाड बाजूला केले. झाड पडल्यामुळे या ठिकाणची वाहतूक बंद करण्यात आली होती. दुसऱ्या बाजूने दोन्ही बाजूकडची वाहतूक सुरू होती.

### इसांबेवाडीत वह्या व खाऊवाटप

**रसायनी :** वनवासी कल्याण आश्रमाच्या वतीने इसांबेवाडीत वह्या, खाऊ वाटप करण्यात आला. वाडीत संस्कारवर्ग शिक्षिका संदेशा हिलम यांनी मुलांना एकत्र केले होते. या कार्यक्रमात सीमा जोशी, संध्या कुलकर्णी, गौरी बागुल यांनीही सहभाग घेतला. सुचेता जोशी यांनी वनवासी कल्याण आश्रमाबद्दल माहिती सांगितली. या वेळी विठाताई, संदेशा, सुचेता जोशी, अनघा कोशे, शिल्पा आपटे आदी उपस्थित होत्या.

### आश्रमातील मुलांना धान्यवाटप

**नवी मुंबई :** नेरूळ प्रभाग क्रमांक ९६/९७मध्ये नवी मुंबई भाजप चिटणीस गणेश भगत व समाजसेवक संजय पाथरे यांच्या वतीने रविवारी (दि. ४) नेरूळ सेक्टर १६ ए मधील जीवन ज्योती आशालय आश्रम मधील मुलांना धान्य वाटप करण्यात आले. नेरूळ परिसरातील रिक्षा चालक आणि साफ सफाई कर्मचारी यांना छत्रीचे वाटप करण्यात आले. या वेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अनिल हेलेकर, दिलिप राऊत, पांडुरंग बेलापुरकर, अशोक पिंगळे, विकास तिकोणे, सागर मोहिते, अशोक गांडाळ, रुणाल सुर्वे, रवींद्र भगत उपस्थित होते.



# मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेचा लाभ घ्या

## पनवेल मनपा आयुक्तांचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेचा शासन निर्णय जारी करण्यात असून ६० वर्षांवरील नागरिकांना योजनेचा लाभ घेता येणार आहे. देशभरातील विविध तीर्थक्षेत्रांसाठी योजना लागू करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेणाऱ्या पात्र लाभार्थ्यांना प्रती व्यक्ती प्रवास खर्चाची कमाल मर्यादा ३० हजार इतकी असणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेची घोषणा केली आहे. पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील जेष्ठ नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्तमंगेश चितळे यांनी केले आहे.



पुण्यकर्म म्हणून तीर्थक्षेत्री जाण्याची सर्वसामान्य कुटुंबातील नागरिकांना असते, परंतु त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे पुरेशी माहिती नसल्याने यात्रा करता येत नाही. हेच स्वप्न पूर्ण करण्यासाठी शासनाने पुढाकार घेतला आहे. मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेचा लाभ घेण्यासाठी महापालिकेच्या पाचही प्रभाग कार्यालयांमध्ये अर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहेत. लाभार्थी नागरिकांनी आपल्या नजिकच्या प्रभाग कार्यालयामध्ये जाऊन हे अर्ज घेऊन भरून द्यावे असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे

**मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेसाठी अपात्र कोण?**

१.ज्यांच्या कुटुंबातील सदस्य आयकरदाता आहे.

२.ज्यांच्या कुटुंबातील सदस्य नियमित/कायम कर्मचारी म्हणून सरकारी विभाग/उपक्रम/मंडळ/ भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत आहेत किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहेत, असे सदस्य या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र ठरणार नाहीत. दरम्यान, २.५० लाखांपर्यंत उत्पन्न असलेले बाह्य यंत्रणाद्वारे कार्यरत असलेले कर्मचारी, स्वयंसेवी कामगार आणि कंत्राटी कर्मचारी मात्र या योजनेसाठी पात्र ठरतील.

३.ज्यांच्या कुटुंबातील सदस्य विद्यमान किंवा माजी खासदार/आमदार आहे.

४.ज्यांच्या कुटुंबातील सदस्य भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या बोर्ड/कॉर्पोरेशन/उपक्रमाचे अध्यक्ष/उपाध्यक्ष/संचालक/सदस्य आहेत.

५.ज्यांच्याकडे चारचाकी वाहनं (ट्रॅक्टर वगळून) त्याच्या कुटुंबातील सदस्यांच्या नावावर नोंदणीकृत आहेत.

६.प्रवासासाठी शारिरीक आणि मानसिकदृष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे आणि कोणत्याही संसर्गजन्य रोगाने ग्रस्त नसावे, जसे की टीबी, हृदयाशी संबंधित श्वसन रोग, कोरोना, थ्रोम्बोसिस, मानसिक आजार, संसर्गजन्य कुष्ठरोग इत्यादी.

७.अर्जासोबत, ज्येष्ठ नागरिकाला सरकारी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पूर्ण आरोग्य तपासणी केल्यानंतर ती व्यक्ती शारीरिकदृष्ट्या निरोगी आणि प्रस्तावित प्रवासासाठी सक्षम असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. (हे प्रमाणपत्र प्रवासाच्या तारखेपासून १५ दिवसांपेक्षा जास्त जुनं नसावं)

८.जे अर्जदार मागील वर्षांमध्ये लॉटरीत निवडले गेले होते, परंतु प्रवासासाठी आमंत्रित करूनही त्यांनी प्रवास पूर्ण केला नाही, अशा माजी अर्जदारांनादेखील या योजनेत पात्र ठरवले जाणार नाही.

९.जर असे आढळून आले की, अर्जदार/प्रवाशाने खोटी माहिती देऊन किंवा कोणतीही तथ्यं लपवून अर्ज केला आहे, ज्यामुळे तो/ती प्रवासासाठी अपात्र ठरते, तर त्याला/तिला कधीही योजनेच्या लाभांपासून वंचित ठेवता येईल.

**तीर्थ दर्शन योजना सुरू करण्यासाठी आवश्यक पात्रता**

१. लाभार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असणं आवश्यक

२. वय वर्ष ६० आणि त्यावरील ज्येष्ठ नागरिक

३. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम २.५० लाखांपेक्षा जास्त नसावे.

४. 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजने'चा लाभ घेण्यासाठी कागदपत्र आवश्यक कागदपत्रासह योजनेच्या लाभासाठी ऑनलाईन अर्ज करावा लागेल.

५. लाभार्थ्याचे आधार कार्ड/रेशनकार्ड ६. महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र

७. महाराष्ट्र राज्यातील जन्म दाखला. (लाभार्थ्यांचे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर त्याऐवजी त्या लाभार्थ्याचे १५ वर्षापूर्वीचे रेशन कार्ड, मतदार ओळखपत्र, शाळा सोडल्याचं प्रमाणपत्र, जन्म दाखला या चारपैकी कोणतेही ओळखपत्र/प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.) सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुटुंब प्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न २.५० लाखांपर्यंत असणं अनिवार्य) किंवा पिवळे/केशरी रेशनकार्ड

**आवश्यक कागदपत्रे**

वैद्यकीय प्रमाणपत्र, पासपोर्ट आकाराचा फोटो, जवळच्या नातेवाईकाचा मोबाईल क्रमांक योजनेच्या अटी शर्तीचे पालन करण्याबाबतचं हमीपत्र

# परेश ठाकूर यांच्या हस्ते मच्छी मार्केटचा शुभारंभ

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघरवासीयांना मच्छी मार्केटमुळे भेडसवणाऱ्या समस्यांची दखल घेऊन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या पुढाकाराने सेक्टर १४ येथील पेट्रोल पंपाच्या बाजूला तात्पुरत्या स्वरुपात मच्छी मार्केट सुरू करण्यात आले आहे. याचा शुभारंभ माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी झाला.



खारघरमध्ये सध्य स्थितीत असलेल्या मच्छी मार्केटमुळे नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लगत आहे. तसेच मच्छी मार्केटमुळे या परिसरात मोठ्या प्रमाणत वाहतूक कोंडी होत होती. नागरीकांच्या सर्व तक्रारी आणि समस्यांची दखल घेऊन सेक्टर १२ मध्ये नव्याने मच्छी मार्केट उभारण्यात येणार आहे. या मच्छी मार्केटचे काम पुर्ण होईपर्यंत सेक्टर १४ येथील पेट्रोल पंपाच्याबाजूला तात्पुरत्या स्वरुपात मच्छी मार्केट स्तलांतरीत करण्यात आले आहे. या मच्छीमार्केटचा शुभारंभ माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी झाला.

या वेळी भाजपचे खारघर शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक अभिमन्यु पाटील, प्रभाग क्रमांक ४चे अध्यक्ष वासुदेव पाटील, उपाध्यक्ष सचिन वासकर, गुरु ठाकुर, विनोद ठाकूर, शैलेन्द्र त्रिपाठी, दीपक ठाकूर, युवा मोर्चाचे खारघर शहर अध्यक्ष नितेश पाटील यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## १२ ऑगस्ट रोजी विभागीय लोकशाही दिन

**नवी मुंबई :** कोकण विभागीय स्तरावरील लोकशाही दिन सोमवारी (दि. १२) सकाळी १०.३० वाजता कोकण भवनातील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या समिती सभागृह, पहिला मजला, कोकण भवन, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे.

लोकशाही दिनाच्या बैठकीस सर्व विभागीय स्तरावरील प्रमुख अथवा त्यांचे प्रतिनिधी यांनी उपस्थित असणे आवश्यक आहे. काही अपरिहार्य कारणामुळे उपस्थित राहणे शक्य नसल्यास त्यांनी विभागीय आयुक्त यांची परवानगी घेणे आवश्यक आहे, असे परिपत्रकाद्वारे उपायुक्त (सामान्य प्रशासन) कोकणभवन संजीव पलांडे यादव यांनी कळविले आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचा स्थापना दिन उत्साहात

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघरमधील रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचा १४वा स्थापना दिवस मंगळवारी (दि. ६) उत्साहात साजरा करण्यात आला.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्व. जनार्दन भगत यांच्या आशीर्वादाने खारघर व खारघर परिसरातील गोरगरीब व गरजू विद्यार्थी व विद्यार्थिनींना शिक्षणाची संधी मिळावी म्हणून हे महाविद्यालय ६ ऑगस्ट २०१० साली सेक्टर १९, रामशेठ ठाकूर



पब्लिक स्कूलमध्ये सुरू केले. त्यावेळी महाविद्यालयामध्ये फक्त तीन विभाग होते. अकाउंट व फायनान्स, माहिती व तंत्रज्ञान व वाणिज्य तसेच त्यावेळची विद्यार्थी संख्याही फक्त ५१ होती. पुढे २०१६साली खारघर येथील सेक्टर ३३मध्ये नवीन इमारतीचे उद्घाटन झाले. आज महाविद्यालयाची भव्य दिव्य अशी इमारत लाभली आहे त्यामध्ये प्रशासकीय कार्यालय, प्रिन्सिपल केबिन, आयटी लॅब, वर्ग खोल्या, ग्रंथालय, आयक्यूएसी रूम, केमिस्ट्री लॅब, बोर्ड रूम विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहेत. आज हे महाविद्यालय नवी मुंबईतील एक नावाजलेले महाविद्यालय म्हणून ओळखले जाते. महाविद्यालयात नेहमी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक, सामाजिक व पर्यावरणीय उपक्रम घेतले जातात.

स्थापना दिवसाचे औचित्य साधून प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी स्व. जनार्दन भगत, स्व. चांगू काना ठाकूर व स्व. भागुबाई चांगू ठाकूर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

या वेळी रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निशा नायर, नुतन ठाकूर तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी स्व. जनार्दन भगत, स्व. चांगू काना ठाकूर व स्व. भागुबाई चांगू ठाकूर यांना अभिवादन केले. कार्यक्रमाचे आयोजन प्रा. रिजवाना मोमीन यांनी केली तसेच स्टाफ वेल्फेअर समितीतील सर्व सदस्य व शिक्षकेतर कर्मचारी आणि उपस्थित राहून सहकार्य केले.

# गव्हाण विद्यालयात इकोफ्रेंडली दिव्यांचे प्रदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दीप अमावस्येचे औचित्य साधून रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये आयोजित करण्यात आलेल्या इको फ्रेंडली दिव्यांचे प्रदर्शन प्रदर्शन व स्पर्धेचे उद्घाटन विद्यालयाचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे यांचे हस्ते झाले. उपस्थित मान्यवर व विद्यार्थ्यांच्या हस्तेही दीपप्रज्वलन करण्यात आले.

**गटनिहाय विजेते**

**लहान गट :** प्रथम : सुहा वाडकर, द्वितीय : प्रसाद ठाकूर, तृतीय : अभिनव पांडे, **उत्तेजनार्थ :** सानवी नाईक, आराध्य सकपाळ, वैष्णव देशमुख; **मोठा गट :** प्रथम : मनस्वी पाटील, व्दितीय : श्रेया साळुंखे

इयत्ता दहावी ड या वर्गाच्या वतीने दीप अमावस्येनिमित्त आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी स्वहस्ते बनविलेल्या इको फ्रेंडली आणि आकर्षक दिव्यांचे प्रदर्शन सर्व विद्यार्थ्यांसाठी कुतुहलाचा विषय ठरला.

उद्घाटनावेळी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, वर्गशिक्षिका योगिता पाटील,संगणक शिक्षिका ज्योत्स्ना कोळी व सोनाली घरत, दर्शना, विद्यालयाचे कनिष्ठ लेखनिक चंद्रकांत मढवी, ग्रंथपाल महेश म्हात्रे व इयत्ता दहावी ड या वर्गातील विद्यार्थी उपस्थित होते.

या वेळी इयत्ता दहावी ड च्या विद्यार्थी प्रतिनिधींनी दिवे प्रज्वलित केले. विद्यार्थ्यांनी स्वहस्ते तयार केलेल्या या आकर्षक आणि इकोफ्रेंडली दिव्यांमधून गटनिहाआय विद्यार्थ्यांना विजयी घोषित करण्यात आले. देवेंद्र म्हात्रे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले, तर शेवटी वर्गशिक्षिका योगिता पाटील यांनी सर्वांचे आभार मानले.



## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात दिवे बनविण्याची स्पर्धा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्रावणाची सुरुवात होण्याआधी महाराष्ट्रभर साजरा केला जाणारा दीप अमावस्या हा सण रयत शिक्षण संस्थेच्या उलवे नोडमधील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालय उलवे या विद्यालयात स्पर्धात्मक पद्धतीने साजरा करण्यात आला. सांस्कृतिक विभागाने हा कार्यक्रम नववीच्या वर्गाकडे सोपविला होता.

इयत्ता आठवी ते दहावीतील विद्यार्थ्यांनी स्वतः हस्तकलेचा वापर करून दिव्यांचे सुशोभीकरण केले होते. दिवे बनविणे व सुशोभीकरण करणे हा स्पर्धेचा विषय होता विद्यार्थ्यांनी अतिशय सुबक दिवे बनविले. त्यातून प्रथम समीक्षा खैरे, द्वितीय दिपाली पवार, तृतीय चंदा माळी व उत्तेजनार्थ वेदिका देशमुख असे क्रमांक विद्यार्थ्यांनी पटकावले या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व रोख रकमेचे बक्षीस देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले. रोख रकमेचे बक्षीस विद्यालयाच्या मुख्याध्यापिका रयतेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी जाहीर केले होते.

नववीच्या वर्गाच्या वर्गशिक्षिका पल्लवी पवार, उपशिक्षिका आशा कस्पटे व प्रत्येक वर्गातील एक विद्यार्थिनी प्रतिनिधी यांची कमिटी बनवून या कमिटीने विद्यार्थ्यांच्या दिव्यांचे मूल्यांकन केले. पल्लवी पवार यांनी उत्कृष्ट पद्धतीने ही स्पर्धा राबविली त्याबद्दल विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर ठाकूर यांनी पल्लवी पवार यांचे अभिनंदन केले.

# स्वप्नपंखी श्रावण

**श्रावण मासी हर्ष मानसी,**
**हिरवळ दाटे चोहिकडे,**
**क्षणात येते सर सर शिरवे,**
**क्षणात फिरुनी ऊन पडे,**

असा कृतार्थ वर्णन ज्या मराठी महिन्याचे केले जाते तो सर्व सणांचा राजा अर्थात 'श्रावण'. तप्त झालेल्या भुईवर थंड पाण्याचा शिडकाव करून वातावरण अल्हाददायक करून पृथ्वी गंधवती करणारा श्रावण, सणांची लगबग सुरू करून व्रत वैकल्यांची मांदीआळ असणारा श्रावण, पानापानांवर हिरवीछटा तयार करणारा आणि त्यांना रंगरूप उधळणारा श्रावण, फळाफुलांचा मातीचा गंध दरवळणारा आणि शेतकऱ्यांना सुखावणारा श्रावण, अशा श्रावण महिन्याचं सहर्ष स्वागत प्रत्येक जण करतो.

श्रावणात घननिळा बरसला असे म्हणत श्रावणाच स्वागत संपूर्ण सृष्टी करते. श्रावण महिन्यात व्रतवैकल्यांची रेलचेल जशी असते तशीच सुग्रास भोजनाचीही असते. पुरण पोळी, ओल्या नारळाच्या करंज्या, नारळी भात, जिभेचे मनसोक्त लाड पुरवले जातात. या काळात मासाहार वर्ज्य केला जातो. आपल्या पूर्वजांनी अतिशय विचारपूर्वक आपल्या आहाराची रचना केलेली आहे. या काळात हवामान पावसाळी असतं हवेतील आर्द्रतेचे प्रमाण वाढलेले असते, अशावेळी हलका आणि सात्विक आहार शरीराला पचायला हलका असतो आणि म्हणूनच या काळात शाकाहाराचा पुरस्कार केला जातो. श्रावण महिन्यात सर्वांत महत्त्व असते ते महिला मुलींच्या आवडीच्या सणांचे. 'नागपंचमी' या सणानं त्याला सुरुवात होते, बर का नागपंचमी म्हणजे मुक्तपणे वावरायचा दिवस, हसायचा, खेळायचा दिवस यामागे ही निसर्गाचे, प्राण्यांचे संवर्धन, हा प्रमुख विचार आपल्या पूर्वजांचा आहेच, शिवाय पूर्वी महिला यांना कामाव्यतिरिक्त बाहेर पडता येणे शक्य नसायचं मग अशावेळी या सणाच्या निमित्ताने का होईना त्या घराबाहेर पडायच्या मनमोकळेपणाने आपल्या सख्यांशी वार्तालाप करायच्या आणि आपला दिवस आनंदात घालवायच्या.

आजही आपल्या पुढच्या पिढीला या सणाची महती आणि महत्त्व आपण सांगायला हवे, पण तेही त्यांच्या भाषेत त्यांना समजेल असे. श्रावण महिन्यात येणारे श्रावणी सोमवार,जरा जिवंतिका व्रत याचबरोबर गोकुळाष्टमी दहीहंडी, आणि बहिण भावाच्या



पवित्र नात्याचा रक्षाबंधन हा सण किती –किती महत्त्व सांगून जातात. दहीहंडी म्हणजे आपल्यातील एकता आणि एकत्रित राहण्याचा भाव आपल्याला सांगून जाते. तर रक्षाबंधन बहीण भावाच्या नात्यांचे बंध दृढ करतात, सण मुळातच मनाला मनाशी जोडण्यासाठी केलेले असतात मग या निमित्ताने सर्वजण एकत्र येतात आजकाल डिप्रेशनच जे लोण आल आहे ना ते सगळे घालवण्यासाठी अशा समाजशील सणांची आपल्याला खऱ्या अर्थाने गरज आहे. मुलांना आपली भारतीय संस्कृती समजून सांगायला हेच सणवार कामी येतात. पण ते सणवार मुलांपर्यंत पोहचवायचे कसे? हा प्रत्येक जणा पुढे पडलेला प्रश्न आहे, पण त्यासाठीसुद्धा एक उपाय आहे बरं का,मुलांना हे सण समजावून सांगायचे असतील तर ते त्यांच्या भाषेत त्यांना समजतील अशा पद्धतीने सांगायचे जेणेकरून त्यांना त्यांचे महत्त्व समजेल आणि कोणतीही पिढी असो एखादी गोष्ट महत्वपूर्ण आणि योग्य भाषेत समजवली ना तर प्रत्येकाला ती समजते आणि पटते म्हणजे मग या सणांचे त्याच्या मागचे शास्त्रीय आणि अध्यात्मिक अशी दोन्ही कारणे मुलांना जर आपण समजावली तर ही पिढी तितक्याच अधिक सहजपणे, सजगपणे हे सगळे सणवार स्वीकारेल आणि आनंदाने साजरे ही करेल मग कोणत्याही इतर उपायांची गरजच भासणार नाही. अशा श्रावण महिन्याविषयी लिहीत असताना किती लिहू आणि काय लिहू असे होऊन जाते, पण तरीही लेखणीला विराम देणे हे लेखाचे आद्य कर्तव्य आहे आणि म्हणूनच जाता जाता मी इतकच लिहिन.

**हिरव्या वाटा उनाड लाटा**
**आणि इंद्रधनुचा काठ,**
**तृणबटा, किरणाछटा हा श्रावणाचा**
**थाट... हा श्रावणाचा थाट..!**

**–स्वप्नाली म्हात्रे,** प्रिन्सिपल,
लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम
स्कूल अ‍ॅण्ड ज्युनिअर कॉलेज, कामोठे

## निवडक

### शिवमंदिरात भाविकांची गर्दी



**मुरूड** : पहिलाच श्रावणी सोमवार असल्याने शहरासह पंचक्रोशी भागातील शिवमंदिरात भक्तांची अलोट गर्दी पाहायला मिळाली. श्रावणातील पहिला वार सोमवार हा योग ७२ वर्षांनी आला. यानिमित्त गुरव पाखाडीतील शेकडो वर्षांपूर्वी प्राचीन शिवमंदिरात पहिल्या पुजेचा मान तेलवडे येथील विलास पाटील व त्यांच्या पत्नी रेखा पाटील यांना मिळाला. पहाटेच्या पहिल्या प्रहारी २.३० वा. शिव शंकराच्या पिंडीवर बेलाची पाने व दुधाने विधीवत पूजा करून सहस्त्र बेल भगवान शंकराला अर्पण करण्यात आला.त्यानंतर पुजा, आरती करून भक्तांना मंदिरात दर्शनासाठी प्रवेश देण्यात आला. महावीर ज्वेलर्स व साई मेडिकल यांच्याकडून मंदिरात भाविकांसाठी प्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

### संत नामदेव संजीवन समाधी सोहळा



**पेण** : पेणमधील नामदेव शिंपी समाजाच्या वतीने श्रीराम मंदिर, प्रभूआळी येथे श्री संत नामदेव महाराज संजीवन संधी सोहळा साजरा करण्यात आला. अध्यक्ष विजय दानवे, उपाध्यक्ष पल्लवी कालेकर, विनायक तांदळे, खजिनदार संतोष मेकडे, सचिव मिलिंद मांढरे, सुभाष मुळे आदींसह समाजबांधव या उत्सहात सामील झाले होते. श्रीराम मंदिर प्रभुआळी येथून दिंडी काढण्यात आली. ही दिंडी महावीर मार्ग, मिरची गल्ली, विठ्ठल मंदिर, विठ्ठल आळी, शिंपी आळी, देवआळी, कुंभार आळीमार्गे पुन्हा श्रीराम मंदिर येथे नेण्यात आली. जय हनुमान भजनी मंडळ यांचा भजनाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. देवळात आरती, रिंगण, फुगडी कार्यक्रम झाला. महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

### समीक्षा नांदगावकरांचा सेवानिवृत्ती समारंभ

**मुरूड** : येथील जिल्हा परिषदेच्या मांडला मराठी शाळेतील मुख्याध्यापिका समीक्षा नांदगावकर यांचा सेवानिवृत्ती सोहळा शाळेच्या सभागृहात झाला. अलिबाग आणि मुरुडसहित जिल्ह्यातील पाच तालुक्यात आजवर त्यांनी सेवा केली. कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थितांमध्ये पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी, मांडल्याचे प्रभारी केंद्रप्रमुख मिलिंद पालवणकर, शाळा व्यवस्थापन अध्यक्ष अपर्णा नागावकर, ग्रामपंचायत सदस्य दिशा नांदगावकर,पदवीधर शिक्षक महेश कवळे, रमाकांत ठाकूर, विष्णू लाडगे, अस्मिता भगत, किरण दिवेकर, शालिनी नागावकर, माधवी चांदोरकर, मनोज सुर्वे, दत्ता नागावकर, रुपाली मुरुडकर, स्वप्निल नांदगावकर, साधनव्यक्ती महेश भगत, संतोष पुकळे, सुनील काळे, मानसी कवळे, हर्षला ठाकूर, महेंद्र सातामकर, निलेश भोपी, राजेश बदे, निलेश माढा, अभिजित लाड आदी उपस्थित होते.



# कर्जतमध्ये डॉ. आंबेडकर भवन उभारणार

## शासनाकडून पाच कोटींचा निधी मंजूर; आमदार थोरवेंची माहिती

**कर्जत : प्रतिनिधी**

शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भवन व्हावे, अशी आंबेडकरी जनतेची मागणी होती. आमदार महेंद्र थोरवे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भवन उभारणार असल्याचे जाहीर केले होते. आमदार थोरवे यांच्या पाठपुराव्यामुळे या भवनासाठी पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्यामुळे आंबेडकरी जनता समाधान व्यक्त करीत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भवन यापूर्वीच उभारले गेले असते,



मात्र जागेसंबंधी तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यामुळे हे भवन रखडले होते. आमदार थोरवे यांनी आंबेडकरी जनतेशी संवाद साधून जागेची अडचण दूर केली आणि त्यासाठी राज्य शासनाकडून पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर करून घेतला.

याविषयी शिवसेना बाळासाहेब भवन सभागृहात एका सभेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी विजय पाटील, आरपीआयचे मारुती गायकवाड, राहुल डाळिंबकर, हिरामण गायकवाड, संकेत भासे, बीआरएसपीचे विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष सुनील गायकवाड आदी उपस्थित होते.

संकेत भासे यांनी, कर्जत शहरात आमदार महेंद्र थोरवे यांच्या प्रयत्नातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन लवकरच उभारले जाईल, असे सांगून डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन कसे साकारले जाईल. त्याची प्रतिकृती स्क्रीनच्या माध्यमातून दाखविली. आमदार थोरवे यांनी, आम्ही एखादे चॅलेंज स्वीकारले की, ते पूर्ण होईपर्यंत पाठपुरावा करीत असतो. सहा महिन्यांपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन उभारणीसाठी पाठपुरावा केल्याने शासनाने पाच कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आणि दिलेला शब्द आम्ही पाळला, असे स्पष्ट केले. आरपीआयचे राहुल डाळिंबकर, बीआरएसपीचे सुनील गायकवाड, बसपाचे सचिन भालेराव, उमेश गायकवाड यांनीही मनोगत व्यक्त केले. या वेळी खालापूर तालुका प्रमुख संदेश पाटील, वंचित आघाडीचे धर्मेंद्र मोरे, भीम आर्मीचे सुमित साबळे आदी उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन उभारण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली. त्यामध्ये आरपीआय आठवले गट, वंचित आघाडी, बीआरएसपी, भीम आर्मी, बहुजन समाज पार्टी या राजकीय पक्षातील कार्यकर्त्यांचा समावेश आहे.

# तळाघर हायस्कूलमध्ये शैक्षणिक साहित्यवाटप



## एक झाड आईसाठी वृक्षारोपण उपक्रम

**धाटाव : प्रतिनिधी**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त रोहा तालुक्यातील पीएनपी तळाघर हायस्कूलला उत्तम दर्जाचा एक कलर प्रिंटर व ९० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य रोहा तालुका भाजप अध्यक्ष अमित घाग यांच्या माध्यमातून देण्यात आले. या वेळी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून एक झाड आईसाठी या उपक्रमांतर्गत तळाघर हायस्कूलच्या परिसरात विविध प्रकारच्या रोपांची लागवड करण्यात आली.

तालुकाध्यक्ष अमित घाग यांनी, आमचे मार्गदर्शक आमदार प्रशांतदादांची गोरगरीब जनतेसाठी काय करता येईल ते करा, तसेच गरिब व गरजू कुटुंबातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक क्षेत्रात मदत करा, वृक्षारोपण व आरोग्य क्षेत्रात काम करा, अशी शिकवण आहे. त्यामुळेच हा उपक्रम हाती घेतला, असे सांगितले.

या वेळी युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस रोशन चाफेकर, तालुका सरचिटणीस कृष्णा बामणे, जिल्हा युवा मोर्चा चिटणीस नरेश कोकरे, रोहा युवा मोर्चा शहराध्यक्ष अनिल घरजाळे, निखिल बोरेले आयटी सेल रोहा तालुकाध्यक्ष, संकेत देसाई, युवा वॉरियर जिल्हा संयोजक वैभव कुलकर्णी, निलेश धुमाळ, संकेत मोरे, हृषीकेश माने, सचिन मोरे, अमर वारंगे, हभप. संकेत महाराज खेरटकर, छगण शिंदे यांसह भाजपचे पदाधिकारी, विद्यार्थी उपस्थित होते.



**मुरूड : राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व माजी जिल्हा परिषद सदस्य सुबोध महाडिक यांना वाढदिवसानिमित्त तालुका अध्यक्ष फैरोज घलटे, सोशल मीडिया सेलचे जिल्हा उपाध्यक्ष हसमुख जैन, वावडुंगी ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अजित कासार व संजय महाडिक यांनी शुभेच्छा दिल्या.**

## विहूर शेकाप सरपंचासह सदस्य शिवसेनेत



**रेवदंडा**, मुरुड तालुक्यातील शेकापच्या अमंलखाली असलेल्या विहूर ग्रामपंचायतीत आमदार महेंद्र दळवी यांनी जोरदार धक्का दिला असून सरपंचांसह सदस्य व ग्रामस्थांनी शिवसेनेत प्रवेश केला. आमदार महेंद्र दळवी यांनी त्यांचे शिवसेनेत स्वागत केले.

अलिबाग येथे राजमाळा निवासस्थानी कार्यालयात पक्षप्रवेश कार्यक्रम झाला. या वेळी मुरुड शिवसेना उपजिल्हा प्रमुख भरत बेलोसे, जिल्हा नियोजन समिती सदस्य निलेश घाटवळ व शिवसेना नेते सी. एम. ठाकूर, दिनेश मिनमिने, उपतालुका प्रमुख मनोज कमाने, माजी सरपंच शिद्रे संतोष पाटील, झिनत हसवारे उपस्थित होते.

विहूर सरपंच रेश्मा तपिसर, सदस्य महेंद्र कदम, गणेश भोईर, विद्या माळी, परेश तांबे, यास्मीन हलडे, गाव अध्यक्ष संतोष पोटले, उपाध्यक्ष अजय वाडकर, माजी सदस्य काशिनाथ पाटील, मनोज भोईर, विनोद बांद्रे, योगेश बांद्रे, काशिनाथ नाईक, प्रशांत बांद्रे, निलेश पाटील, महेश भोईर, प्रकाश भोईर, संदेश मोहिते, संदेश दळवी आदींनी शिवसेनेत प्रवेश केला. मुरुड तालुक्यात जास्तीत जास्त निधी उपलब्ध केला असून अनेक विकासांची कामे मार्गी लावली आहेत. मुरुडचा सर्वांगिण विकास हे स्वप्न साकारण्याचा प्रयत्न आमदार म्हणून केला असल्याचे आमदार महेंद्र दळवी यांनी सांगितले.

## आसरेवाडी येथे कृषी मार्गदर्शन शिबिर

**चौक** : राज्य सरकारतर्फे १ ते १५ ऑगस्ट महसूल पंधरवडा कार्यक्रम सुरू असून त्यानिमित्ताने आसरे या महसुली गावी शेती पंधरवडा कार्यक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाचे आयोजन मंडळ अधिकारी अशोक सुसलादे यांनी केले होते. या वेळी कृषी अधिकारी नितीन महाडिक, सहाय्यक कृषी चित्रा सारंग यांनी शेतकरी यांच्याशी संवाद साधला. आधुनिक शेती, पावसाळी वाहून जाणाऱ्या पाण्याची साठवण करणे, ऑरगॅनिक शेती, खताचा वापर कमीत कमी करणे, भात शेती व्यतिरिक्त भाजीपाला, शेतीपुरक जोडधंदा, कमी मजुरात जास्त शेती लागवड करून जास्त प्रमाणात उत्पादन कसे मिळेल, शेती विषयी विविध योजनांची माहिती देण्यात आली. तलाठी सजा वावंढळ अमोल बोराटे यांनी ई-पीक पाणी, ७/१२ नोंदी यांची शेताच्या बांधावर नोंदणी करणे बाबत सविस्तर माहिती दिली.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की,

ज्या अर्थी श्री. रत्नराज गंगाराम बनसोड यांच्या मालकी वहीवाटीची व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहीवाटीतील मौजे वलाप, ता. सुधागड, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची जमीन मिळकत त्यांचेकडुन आमचे अशिल यांस मोबदल्यापोटी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे वलाप, ता. सुधागड, जि. रायगड**

| अ.नं. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे. आर | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | १२ | १ | ०.६७.६० | ५.०१ |
| २ | १२ | २ | ०.२६.६० | २.३१ |
| ३ | १२ | ५ | ०.१३.१० | १.३१ |
| ४ | १२ | ६ | ०.०४.०० | ०.२० |
| ५ | १२ | ७ | ०.०४.८० | १.०० |
| ६ | १३ | – | ०.१२.१० | ०.५६ |
| ७ | १४ | १ ब | ०.२३.०० | ४.०० |
| ८ | १४ | २ ब | ०.१९.०० | ३.२२ |

त्याअर्थी सदर मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण–दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यू हुकुमनामा, मनाई, आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क –हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधित व्यक्ती, संस्था ईत्यादींना त्यांची लेखी हरकत जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन सात (७) दिवसांच्या आत आमच्या खालील प्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहीत मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न असल्यास सदर मिळकतीवरील श्री. रत्नराज गंगाराम बनसोड यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत हे सर्व जाहीर व्हावे.

ठिकाण : महाड
दिनांक : ०६/०८/२०२४

**सही/–**
**ॲड. श्री. महेश दिक्षीत**
पत्ता : ऑफीस नं. ३०३/अ, ३ रा मजला, स.नं.६९५/१, पुणे सातारा रोड, स्वारगेट, पुणे ४१० ०३७.
मोबा नं. ९८९०२१२८१८, ९४२२२४२६६८

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे व तसा साठेकरार ही त्यांचेबरोबर केलेला आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसाच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे – तुरमाळे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड.**

| सर्व्हे नंबर/ गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. | मालकाचे नांव |
|---|---|---|---|---|
| ५९ | ३ | ०–७६–३० पो.ख.०–००–५० एकूण०–७६–८० | १६.८७ | श्री. गणपत नारायण पाटील |

वरील एकूण क्षेत्रापैकी खरेदी करत असलेले क्षेत्र ०– ३६ – ८० हे. आर. पॉ.

**पनवेल.**
**दिनांक : ०६/०८/२०२४.**

**सही/–**
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**
**ॲडव्होकेट**
पत्ता :– शॉप नं. १३, साई साज सोसायटी, प्लॉट नंबर ३, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.

मा. बोराडे मॅडम कोर्ट

**अर्जदाराचे वकील**
**सोनिया ना. शिरसाठ**
नि. ७/ड

प्रो.जमा.

### जाहीर नोटीस

दिवाणी चौकशी अर्ज ७०९/२०२४
पुढील तारीख २०/९/२०२४

**पनवेल येथिल मे. दिवाणी न्यायाधिश सा़ो कनिष्ठ स्तर, पनवेल यांचे न्यायालयात**

१. श्रीमती. लता भगवान बाबर व इतर ५ .....अर्जदार
विरुध्द
कोणीही नाही .... जाबदार

सर्व लोंकाना या नोटिसद्वारे कळविण्यात येते की,

ज्यापेक्षा **कै. भगवान काशिनाथ बाबर** यांचे दिनाक **२३/०५/२०२२** रोजी गांधी मैदान, रूम नं. ४०६, श्री. साईनाथ नगर को–ऑप–हौसिंग सोसयटी, चेंबूर, महाराष्ट्र–४०००७१ येथे मयत झाले असून अर्जदार प्रस्तुतचे अर्जदार क्र. १ हया पत्नी, अर्जदार क्र. २ हा मुलगा, अर्जदार क्र . ३ ते ५ हया मुली हे त्यांचे कायदेशिर वारस आहेत. मानसरोवर कॉप्लेक्स, बिल्डींग नं. ३ बी विंग, रूम नं. ६०३, मानसरोवर रेल्वे स्टेशन जवळ, सेक्टर नं. ३४, कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड–४१०२०६ येथे राहत असून सदर मयताच्या नावे खालीलप्रमाणे मिळकत आहे.

यांनी खालील वर्णाच्या मिळकतीबाबत वारसा दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| | |
|---|---|
| १ | मानसरोवर कॉप्लेक्स, बिल्डींग नं. ३, बी विंग, रूम नं. ६०३, मानसरोवर रेल्वे स्टेशन जवळ, सेक्टर नं. ३४, कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड–४१०२०६. ( 280 Sq.ft. of 31.22 Sq. Miter Builtup of Carpet Area 400 Sq. Ft.) |

वरील अर्जदार हे मयत **कै. भगवान काशिनाथ बाबर** यांचे वारस आहेत, या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीला हरकत असल्यास, त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत, या मे. कोर्टात हजर राहून हरकत घेतली नाही तर हे मे. कोर्ट वरील अर्जदार यांच्या अर्जा कामी पुरावा घेण्याची कार्यवाही करील,

तसेच अर्जदार हे **कै. भगवान काशिनाथ बाबर,** यांचे वारस असल्याने शाबीत झाले तर त्यांस वारसादाखला मंजूर करील याची दखल घ्यावी.

आज दि. ६/८/२४ रोजी माझी सही न्यायालयाच्या शिक्कयासह दिली.

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, पनवेल

### खोपोली नगरपरिषद, जि. रायगड

बजेटरी कोटेशन सूचना

सन २०२४–२५ करिता ताकई यात्रेसाठी मंडपगाळे व विद्युत व्यवस्था करणेच्या विविध कामांकरिताचे दरपत्रक मागविणेकामी इच्छुक कंत्राटदारांकडून बजेटरी कोटेशन करिताच्या नमुद अटी व शर्तीच्या अधीन राहून सिलबंद लिफाफ्यात बजेटरी कोटेशन मागविण्यात येत आहे.

बजेटरी कोटेशन फॉर्म कार्यालयीन वेळेत दिनांक ०७/०८/२०२४ ते १४/०८/२०२४ पर्यंत सकाळी १०.३० ते दु. ५.०० वाजेपर्यंत पथदिप विभागातुन प्राप्त करता येईल. सदर कामी नमुद अटी व शर्ती बजेटरी कोटेशन फॉर्मसोबत संलग्न करण्यात येत आहे. सिलबंद बजेटरी कोटेशन दिनांक ०७/०८/२०२४ ते १४/०८/२०२४ या कालावधीत सकाळी ११.०० ते सायं. ५.०० या कालावधीत नगर परिषद कार्यालयात सादर करता येईल.

सविस्तर बजेटरी कोटेशन संबंधी अतिरिक्त माहिती नगरपरिषदेचे पथदिप विभागात कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस खेरीज) मिळू शकेल.

**जा.क्र. केएमसी/प.वि./६७३/२०२४**
**दि. ०६/०८/२०२४**

**सही/–**
**विद्युत अभियंता**
**खोपोली नगरपरिषद**

**सही/–**
**लेखापाल**
**खोपोली नगरपरिषद**

### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक १३/२०२४–२०२५ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | खांदा कॉलनी पनवेल येथील नवीन प्रशासकीय इमारत व कर्मचारी वसाहतीची देखभाल व दुरूस्ती करणे...खांदा कॉलनी पनवेल येथील नवीन प्रशासकीय इमारत व कर्मचारी वसाहत, पार्किंग एरिया व रस्त्याची साफसफाई व देखभाल करणे. | ₹ ३३,२२,९८०.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक ०७/०८/२०२४ ते दिनांक १६/०८/२०२४ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक ०८/०८/२०२४ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक ०९/०८/२०२४ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### e-TENDER NOTICE –

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-44/ 24-25 7000032590 | AMC of collapsed/Breakdown of EHV Lines under EHV line maint. S/Dn. Panvel - I under EHV (O&M) Dn. Panvel for 2024-2025 | **Rs. 50.00 Lakhs** |
| Tend-45/ 24-25 7000032569 | AMC of collapsed/Breakdown of EHV Lines under EHV line maint. S/Dn. Panvel - II under EHV (O&M) Dn. Panvel for 2024-2025 | **Rs. 50.00 Lakhs** |

**EMD 1% of estimated cost, Submission of bids from 05.08.2024 to 12.08.2024 at 11:00 hrs, Opening date: 12.08.2024 at 11:30 Hrs. Tender Fee- Rs. 500/-+ GST** each tender. For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: The Executive Engineer(Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9769006131.
E-mail ID se7200@mahatransco.in

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचे क्रीडा स्पर्धांमध्ये सुयश

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाने क्रीडा स्पर्धांमध्ये सुयश प्राप्त केले आहे. याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.





इयत्ता बारावी विज्ञान शाखेत शिकणारा समीर चव्हाण याने मिक्स मार्शल आर्ट्स नॅशनलमध्ये सुवर्णपदक पटकावले. नॅशनल युथ एमएमए चॅम्पियनशिप, पीएमएल यांनी या स्पर्धेचे आयोजन अंधेरी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे केले होते, तर बारावी विज्ञान शाखेचा तनिल उकर्डे याने राज्यस्तरीय किक बॉक्सिंग स्पर्धेत रौप्यपदक जिंकले. वॉरियर ड्रिम सिरीज ८ यांनी या स्पर्धेचे आयोजन नवी मुंबई मिक्सड् मार्शल आर्ट्स असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने केले होते.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कौतुक केले. या वेळी व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य निशा नायर आदी उपस्थित होते. दरम्यान, या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, कार्यकारी मंडळ सदस्य संजय भगत, स्कूल कमिटी सदस्य प्रभाकर जोशी यांनीही अभिनंदन केले.

# ‘सीकेटी’चे विद्यार्थी स्पर्धांमध्ये चमकले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पुणे बालेवाडी येथे आयोजित वाको इंडिया नॅशनल चिल्ड्रन अ‍ॅण्ड कॅडेट्स किकबॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयातील वरद कृष्णत काळंगे याने सुवर्णपदक पटकाविले तसेच त्याची हंगेरी येथे होणाऱ्या वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्येही निवड झाली आहे. याशिवाय माणगाव तालुक्यातील गोरेगाव येथे झालेल्या रायगड जिल्हास्तरीय किक बॉक्सिंग स्पर्धा आणि राज्यस्तरीय मिक्स बॉक्सिंग निवड स्पर्धेत सिया पालवणकर हिने प्रथम क्रमांक पटकावला तसेच तिला उत्कृष्ट खेळाडू हा पुरस्कारही मिळाला.





याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दोन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी मुख्याध्यापक सुभाष मानकर व मोरे सर उपस्थित होते. सियाच्या यशात प्रशिक्षक स्वप्नील सोनावणे यांचे योगदान आहे.








पनवेल : भाजप उत्तर रायगड जिल्हा विस्तारित कार्यकारिणी बैठक फडके नाट्यगृहात झाली.




## पॅरिस ऑलिम्पिकमध्ये मनू भाकरला बहुमान

### समारोप समारंभात भारतीय चमूच्या ध्वजवाहकाची धुरा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारतासाठी दोन कांस्यपदके जिंकत नेमबाज मनू भाकरने इतिहास घडवला आहे. त्यामुळे आता मनूवर भारतीय ऑलिम्पिक संघटनेने मोठी जबाबदारी सोपवली आहे. मनू येत्या रविवारी पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेच्या समारोप समारंभात भारताची ध्वजवाहक असेल.

फ्रान्सच्या राजधानीत ११ ऑगस्ट रोजी समारोप सोहळा होणार आहे. भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या (आयओए) अधिकाऱ्याने सांगितले की, ध्वजवाहक म्हणून मनूची निवड करण्यात आली आहे. तिने उत्कृष्ट कामगिरी केली आणि ती यासाठी पात्र आहे. आयओएने अद्याप पुरूष ध्वजधारकाची घोषणा केलेली नाही. २६ जुलै रोजी झालेल्या उद्घाटन समारंभात टेबल टेनिस खेळाडू शरथ कमल पुरुष ध्वजवाहक आणि पीव्ही सिंधू महिला ध्वजवाहक होत्या.

## राष्ट्रीय बीच कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे संघ जाहीर





**मुंबई : प्रतिनिधी**

बिहारमधील बुद्धगया येथे होणाऱ्या ११व्या पुरुष व महिला राष्ट्रीय बीच कबड्डी स्पर्धेकरिता महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशने आपले दोन्ही संघ जाहीर केले आहेत. पुणे शहराच्या आम्रपाली गलांडे हिच्याकडे महिला संघाचे, तर नाशिक शहरच्या आकाश शिंदे याच्याकडे पुरुष संघाचे नेतृत्व सोपविण्यात आले.

भारतीय कबड्डी महासंघाच्या मान्यतेने बिहार राज्य कबड्डी असोसिएशनच्या वतीने ९ ते ११ ऑगस्ट या कालावधीत राष्ट्रीय बीच कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. निवडण्यात आलेला हा संघ हावडा मेलने दादर येथून स्पर्धेकरिता प्रयाण करेल, अशी माहिती राज्य कबड्डी असोसिएशनचे सचिव बाबुराव चांदेरे यांनी प्रसारमाध्यमांना दिली.













दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com